# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

दूरध्वनी क्रमांक :
(०२०)२५६०१२६५
(०२०)२५६०१२६४
ई—मेल : pldvp@unipune.ac.in

गणेशखिंड, पुणे ४११००७.
नियोजन व विकास विभाग

संदर्भ —साफुपुवि/निववि/५९३

दिनांक : २४ ऑगस्ट, २०१९

प्रति,
मा. प्राचार्य/संचालक,
बिगर आदिवासी व आदिवासी विभागातील
सर्व संलग्न महाविद्यालये/मान्यताप्राप्त परिसंस्था.

विषय: शैक्षणिक वर्ष २०१९-२० मध्ये गुणवत्ता सुधार योजनेअंतर्गत चर्चासत्र/परिषदा/कार्यशाळा आयोजन, कार्यालयीन, शैक्षणिक व प्रयोगशाळा उपकरणे व अपंग/दिव्यांग व्यक्तींसाठी उपयोगी वस्तू खरेदी, क्रिडा साहित्य, बांधकाम व आदिवासी विभागातील महाविद्यालये/ परिसंस्थाकरिता गरजेवर आधारित उपक्रम इ. करिता अर्थसहाय्यासाठी ऑनलाईन पध्दतीने प्रस्ताव सादर करणेबाबत.

महोदय/महोदया,

गुणवत्ता सुधार योजनेअंतर्गत बिगर आदिवासी व आदिवासी विभागातील विद्यापीठ संलग्न महाविद्यालये व मान्यताप्राप्त परिसंस्थांकडुन शैक्षणिक वर्ष २०१९-२० साठी चर्चासत्र/परिषदा/कार्यशाळा आयोजन, कार्यालयीन, शैक्षणिक व प्रयोगशाळा उपकरणे व अपंग/दिव्यांग व्यक्तीसाठी उपयोगी वस्तू खरेदी, क्रिडा साहित्य खरेदी, बांधकाम व बांधकामाअंतर्गत सौर ऊर्जा उपकरणे इत्यादींकरिता, तसेच आदिवासी विभागातील महाविद्यालये/परिसंस्थेतील विद्यार्थ्याकरिता गुणवत्तेनुसार गरजेवर आधारित उपक्रमांतर्गत सायकल खरेदीकरीता अर्थसहाय्यासाठी ऑनलाईन पध्दतीने प्रस्ताव मागविण्यात येत आहेत.

सदर प्रस्ताव ऑनलाईन पध्दतीने सादर करण्याचा कालावधी दिनांक २४ ऑगस्ट, २०१९ ते १४ सप्टेंबर, २०१९ असा राहणार आहे.

सदर प्रस्ताव ऑनलाईन पध्दतीने सादर करण्याची लिंक खालीलप्रमाणे :—
(unipune.ac.in-Home page-BOD online-Login-For College Users-College Login & Password-Main Menu-QIP)

चर्चासत्र/परिषदा/कार्यशाळा आयोजन, कार्यालयीन, शैक्षणिक व प्रयोगशाळा उपकरणे व अपंग/दिव्यांग व्यक्तींसाठी उपयोगी वस्तू खरेदी, क्रिडा साहित्य खरेदी, बांधकाम इत्यादींकरिता, तसेच आदिवासी विभागातील महाविद्यालये/परिसंस्थेतील विद्यार्थ्याकरिता गुणवत्तेनुसार गरजेवर आधारीत उपक्रमांतर्गत सायकल खरेदीसाठी ऑनलाईन पध्दतीने सादर केलेल्या प्रस्तावाच्या हार्ड-कॉपी व त्यासोबत मार्गदर्शकतत्वांमध्ये (मार्गदर्शकतत्वांमध्ये वेळोवेळी करण्यात येणारे बदल सर्व संबंधित महाविद्यालये/परिसंस्थांना बंधनकारक राहतील) नमूद केल्याप्रमाणे आवश्यक ती सर्व कागदपत्रे जोडून सदर हार्ड-कॉपी बुधवार, दिनांक १८ सप्टेंबर, २०१९ पर्यंत कार्यालयीन वेळेत नियोजन व विकास विभागामध्ये जमा करण्यात यावी.

संबंधित महाविद्यालये/परिसंस्थांनी ऑनलाईन प्रस्तावांची हार्ड-कॉपी अंतिम तारखेपर्यत नियोजन व विकास विभागामध्ये जमा न केल्यास, तसेच ऑनलाईन व्यतिरिक्त सादर केलेल्या कोणत्याही प्रस्तावांचा अर्थसहाय्यासाठी विचार केला जाणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

कळावे,

आपला,

24/8/19

(मुंजाजी रासवे)
उपकुलसचिव
नियोजन व विकास विभाग

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

## गुणवत्ता सुधार योजनेंतर्गत विविध उपक्रम व योजना राबविण्यासाठी बिगर आदिवासी विभागातील महाविद्यालये/परिसंस्थांना देण्यात येणाऱ्या अर्थसहाय्याबाबतची मार्गदर्शकतत्वे

## (शैक्षणिक वर्ष २०१९—२०)

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या नियोजन व विकास विभागामार्फत गुणवत्ता सुधार योजनेअंतर्गत विविध उपक्रम व योजना राबविण्यासाठी अर्थसहाय्य दिले जाते. या योजनेअंतर्गत सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ संलग्न महाविद्यालये व मान्यताप्राप्त परिसंस्थांनी सादर केलेल्या प्रस्तावानुसार व गुणवत्ता सुधार योजनेच्या मार्गदर्शक तत्वांनुसार अर्थसहाय्य देण्यात येते. सदर आर्थिक वर्षात अर्थसहाय्यासाठी एकदाच ऑनलाईन पध्दतीने प्रस्ताव सादर करता येईल.

या योजनेअंतर्गत प्रामुख्याने राज्य, राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय पातळीवरील कार्यशाळा/ चर्चासत्रे/परिषदांचे आयोजन, क्रिडा साहित्य खरेदी, कार्यालयीन, शैक्षणिक व प्रयोगशाळा उपकरणे व अपंग/दिव्यांग व्यक्तींसाठी उपयोगी वस्तु खरेदी तसेच नवीन बांधकाम व त्या अंतर्गत सौर—ऊर्जा उपकरणे इत्यादिसाठी अर्थसहाय्य देण्यात येते.

- ### कार्यशाळा/चर्चासत्रे/परिषदा :

**अ) राज्यस्तरीय कार्यशाळा/चर्चासत्र/परिषदा** — फक्त नॅक/एन.बी.ए. मूल्यांकन अथवा पुनर्मूल्यांकन केलेली अथवा मूल्यांकन/पुनर्मूल्यांकनाकरीता अर्ज दाखल केलेली महाविद्यालये/परिसंस्था किंवा नॅक अथवा एन.बी.ए.मूल्यांकन करण्यासंदर्भात आवश्यक फी भरल्याच्या चलनाची सांक्षाकित प्रत प्रस्तावासोबत सादर केलेल्या महाविद्यालयांना/ परिसंस्थांना राज्यस्तरीय कार्यशाळा/चर्चासत्र/परिषदेच्या आयोजनासाठी प्रस्ताव सादर करता येईल.

**ब) राष्ट्रीय स्तरावरील कार्यशाळा/चर्चासत्र/परिषदा** — फक्त नॅक/ एन.बी.ए. मूल्यांकन अथवा पुनर्मूल्यांकन केलेली अथवा मूल्यांकन/पुनर्मूल्यांकनाकरीता अर्ज दाखल केलेली महाविद्यालये/परिसंस्था किंवा नॅक अथवा एन.बी.ए.मूल्यांकन करण्यासंदर्भात आवश्यक फी भरल्याच्या चलनाची सांक्षाकित प्रत प्रस्तावासोबत सादर केलेल्या महाविद्यालयांना/ परिसंस्थांना राष्ट्रीय स्तरावरील कार्यशाळा/चर्चासत्र/परिषदेच्या आयोजनासाठी प्रस्ताव सादर करता येईल. तसेच एखाद्या व्यावसायिक अभ्यासक्रम चालवणा—या महाविद्यालय/परिसंस्थेने नॅक मुल्यांकन केले नाही परंतु ज्या विषयाचे एन.बी.ए. मूल्यांकन केलेले असेल त्याच

विषयासाठी राष्ट्रीय कार्यशाळा/ चर्चासत्र/परिषदेच्या आयोजनासाठी प्रस्ताव सादर करता येईल. त्याचप्रमाणे ज्या विषयासाठी प्रस्ताव सादर करावयाचा आहे त्या विषयाच्या पदव्युत्तर अभ्यासक्रमास विद्यापीठाचे संलग्नीकरण असणे आवश्यक आहे. त्याबाबतचे पत्र प्रस्तावासोबत जोडणे अनिवार्य आहे.

**क) आंतरराष्ट्रीय स्तरावरील कार्यशाळा/चर्चासत्र/परिषदा**— फक्त नॅक/एन.बी.ए. मूल्यांकन अथवा पुनर्मूल्यांकन केलेली अथवा मूल्यांकन/पुनर्मूल्यांकनाकरीता अर्ज दाखल केलेली महाविद्यालये/परिसंस्था किंवा नॅक अथवा एन.बी.ए.मूल्यांकन करण्यासंदर्भात आवश्यक फी भरल्याच्या चलनाची सांक्षाकित प्रत प्रस्तावासोबत सादर केलेल्या महाविद्यालयांना/ परिसंस्थांना आंतरराष्ट्रीय स्तरावरील कार्यशाळा/चर्चासत्र/परिषदेच्या आयोजनासाठी प्रस्ताव सादर करता येईल. तसेच एखाद्या महाविद्यालय/परिसंस्थेने नॅक मुल्यांकन केले नाही परंतु ज्या विषयाचे एन.बी.ए. मूल्यांकन केलेले असेल त्याच विषयासाठी आंतरराष्ट्रीय कार्यशाळा/चर्चासत्र/परिषदेच्या आयोजनासाठी प्रस्ताव सादर करता येईल. त्याचप्रमाणे ज्या विषयासाठी प्रस्ताव सादर करावयाचा आहे त्या विषयाच्या पीएच.डी. संशोधन केंद्रास विद्यापीठाची मान्यता असणे आवश्यक आहे. त्याबाबतचे चालू वर्षाचे मान्यतापत्र प्रस्तावासोबत जोडणे अनिवार्य आहे.

| अ. क्र. | स्तर | कालावधी | कमीत कमी सहभागी व्यक्तींची संख्या | पैकी विद्यापीठ कार्यक्षेत्रा बाहेरील सहभागी व्यक्तींची संख्या | जास्तीत जास्त मंजुर अर्थसहाय्य रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|---|
| १ | राज्यस्तरीय | २ दिवस | ३० | किमान १० विद्यापीठ कार्यक्षेत्रा बाहेरील सहभागी व्यक्ती. | कमाल रु. १,००,०००/— |
| २ | राष्ट्रीय | २ दिवस | ३० | किमान १०राज्याबाहेरील सहभागी व्यक्ती व किमान १० विद्यापीठ कार्यक्षेत्रा बाहेरील सहभागी व्यक्ती. | कमाल रु. २,००,०००/— |
| ३ | आंतरराष्ट्रीय | २ दिवस | ३० | किमान ५ आंतरराष्ट्रीय सहभागी व्यक्ती व किमान १० राज्याबाहेरील सहभागी व्यक्ती (भारताबाहेरील व्यक्तींमध्ये दोन साधनव्यक्तीं व तीन संशोधन पेपर सादर करणाऱ्या व्यक्तींचा सहभाग अनिवार्य आहे). | कमाल रु. ३,००,०००/— |

**(टीप :महाविद्यालय/परिसंस्थेतील विद्यार्थ्यांना कार्यशाळा/चर्चासत्र/परिषदा यांमध्ये उपस्थित राहता येईल परंतु सहभागी व्यक्तींच्या यादीमध्ये विद्यार्थ्यांचा समावेश अनुदानासाठी अनुज्ञेय राहणार नाही)**

- संबंधित महाविद्यालय/परिसंस्थेमध्ये बाहेरील राज्यातील शिकत असलेल्या विद्यार्थ्यांना महाराष्ट्राबाहेरील सहभागी व्यक्ती म्हणून गृहीत धरता येणार नाही. तसेच परदेशातील भारतात शिक्षण, नोकरी, अथवा व्यवसायासाठी येणाऱ्या व्यक्तींना आंतरराष्ट्रीय सहभागी व्यक्ती म्हणून गृहीत धरता येणार नाही. त्याचप्रमाणे भारतामधून परदेशात शिक्षण अथवा नोकरीसाठी गेलेल्या

व्यक्तींना परदेशी सहभागी व्यक्ती म्हणून ग्राहय धरता येणार नाही. त्याचप्रमाणे कार्यशाळा/चर्चासत्र/परिषदेच्या विषयाशी संबंधित नसलेल्या परदेशी व्यक्तींना परदेशी सहभागी व्यक्ती म्हणून ही धरता येणार नाही. अंतरराष्ट्रीय सहभागी व साधन व्यक्तीचा पासपोर्ट दुसऱ्या देशाचा असणे अनिवार्य आहे.

- एकाच संस्थेच्या विविध महाविद्यालये/परिसंस्थांनी एकाच ठिकाणी, एकाच दिवशी राज्य, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवरील कार्यशाळा/चर्चासत्र/परिषदांचे आयोजन करू नये. तसेच कार्यशाळा/चर्चासत्र/परिषदांचे आयोजन एकच दिवस केल्यास अर्थसहाय्य मंजूर केले जाणार नाही. परंतु दोन दिवसापेक्षा जास्त दिवस कार्यशाळा/चर्चासत्र/परिषदांचे आयोजन केल्यास फक्त दोन दिवसांचा खर्च अनुदानास पात्र राहिल.

- शैक्षणिक/औद्योगिक क्षेत्रामध्ये काम करणारी व्यक्ती जर कार्यशाळा/चर्चासत्रे/परिषदेस उपस्थित राहणार असेल तर ती व्यक्ती काम करित असलेल्या संबंधित महाविद्यालय/ परिसंस्थेच्या अथवा अस्थापनेच्या ओळखपत्राची दोन्ही बाजूची सुस्पष्ट प्रत संबंधितांनी स्व:स्वाक्षरीने साक्षांकित केलेली असली पाहिजे व संबंधित महाविद्यालय/ परिसंस्था/ अस्थापनेच्या लेटर हेडवर सदर व्यक्तीस कार्यशाळा/चर्चासत्रे/परिषदेस उपस्थित राहण्यासाठी कार्यमुक्त केल्याचा पुरावा, सहभागी व्यक्तीच्या पासपोर्ट व व्हिसाची प्रत कार्यशाळा/ चर्चासत्रे/परिषदेचे हिशेब सादर करताना सहभागी व्यक्तींच्या यादीबरोबर जोडणे आवश्यक आहे. औद्योगिक क्षेत्रामध्ये काम करणाऱ्या सहभागी व्यक्तींच्या ओळखपत्रावर फक्त कंपनीचे नाव व तेथे काम करणाऱ्या व्यक्तींचे नांव व फोटो असेल परंतू कंपनीचे ठिकाण दूरध्वनी क्रमांक, अधिकाऱ्यांची सही ओळखपत्रधारक व्यक्तीचे पद इत्यादी उल्लेख नसेल तर अशा प्रकारची ओळखपत्रे ग्राहय धरली जाणार नाहीत. अशा सहभागी व्यक्तींना ओळखपत्रासोबत संबंधित अस्थापनेचे पत्र जोडणे अनिवार्य आहे. जर कार्यशाळा/चर्चासत्रे/परिषदेस औद्योगिक क्षेत्रातील व्यक्ती उपस्थित राहणार असतील तर त्यांचे प्रमाण कार्यशाळा/चर्चासत्रे/परिषदेस विद्यापीठ कार्यक्षेत्रामधील तसेच विद्यापीठ कार्यक्षेत्रा बाहेरील एकूण सहभागी व्यक्तींच्या संख्येच्या प्रमाणात ५० टक्के पेक्षा जास्त असू नये.

- महाराष्ट्राबाहेरील एखादी व्यक्ती जर महाराष्ट्रात नोकरी निमित्ताने रहात असेल तर अशा व्यक्तीस महाराष्ट्राबाहेरील सहभागी व्यक्ती म्हणून गृहीत धरता येणार नाही.

- सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ कार्यक्षेत्रामधील संलग्न महाविद्यालय/परिसंस्थेंतील कार्यरत अध्यापकांनी जर विद्यापीठ कार्यक्षेत्राबाहेरील विद्यापीठात पीएच.डी. संशोधन पदवी साठी प्रवेश घेतला असेल तर अशा व्यक्तींना विद्यापीठ कार्यक्षेत्राबाहेरील अथवा महाराष्ट्राबाहेरील सहभागी व्यक्ती म्हणून गृहीत धरता येणार नाही.

- विद्यापीठ संलग्न महाविद्यालयाच्या संस्थेचे जर स्वतंत्र खाजगी विद्यापीठ असेल तर अशा खाजगी विद्यापीठातील व्यक्तींना सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ कार्यक्षेत्राबाहेरील सहभागी व्यक्ती म्हणून गृहीत धरता येणार नाही.

- विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रामधील संलग्न महाविद्यालये/परिसंस्थेमधील व्यक्तींना राज्याबाहेरील सहभागी व्यक्ती म्हणून गृहीत धरण्यात येणार नाही.

- राज्य, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवरील कार्यशाळा/परिषदा/चर्चासत्र आयोजन करण्यासाठी मंजूर करण्यात आलेल्या रकमेचा विनियोग खालीलप्रमाणे करण्यात यावा. यामध्ये विद्यापीठाचा हिस्सा ७५% आणि महाविद्यालये/परिसंस्थांचा हिस्सा २५% असा राहील.
  अ. साधनव्यक्तींचा मानधन व प्रवासखर्च — ४०%
  ब. संशोधन पत्रिका/लेख प्रकाशन — १०%
  क. परिषदेसाठी आवश्यक शैक्षणिक साहित्य/छायांकित प्रत, सीडी इ.—२०%
  ड. आतिथ्य खर्च, किरकोळ व आकस्मिक खर्च — ३०%
  उपरोक्त नमूद केलेल्या टक्केवारीनुसार अर्थसहाय्याचा विनियोग त्या त्या अर्थशीर्षासाठी करण्यात यावा. अन्य अर्थशीर्षासाठी खर्च करण्यात येवू नये. (उदा. अ—४०%, ब—१०%, क—२०%, ड—३०% यामध्ये त्या—त्या टक्केवारीपेक्षा जास्त खर्च देय होणार नाही किंवा त्या टक्केवारीमधील शिल्लक रक्कम इतरत्र वापरता येणार नाही).

- कार्यशाळा/परिषदा/चर्चासत्र यासाठी उपस्थित राहणाऱ्या साधनव्यक्तींना देण्यात येणारे मानधन खालीलप्रमाणे देय राहील.
  - **राज्यस्तरीय कार्यशाळा/परिषदा/चर्चासत्र** यासाठी उपस्थित राहणाऱ्या साधनव्यक्तीस **प्रति दिन प्रत्येकी रु.२०००/—** इतके मानधन देण्यात यावे.
  - **राष्ट्रीय स्तरावरील कार्यशाळा/परिषदा/चर्चासत्र** यासाठी उपस्थित राहणाऱ्या साधनव्यक्तीस **प्रति दिन प्रत्येकी रु.३०००/—** इतके मानधन देण्यात यावे.
  - **आंतरराष्ट्रीय पातळीवरील कार्यशाळा/चर्चासत्रे/परिषदा** यासाठी उपस्थित राहणाऱ्या **भारतातील साधन व्यक्तींना प्रति दिन प्रत्येकी रु.३०००/—** आणि **भारताबाहेरील साधन व्यक्तींना प्रति दिन प्रत्येकी रु.५०००/—** इतके मानधन देण्यात यावे.

उपरोक्त कार्यशाळा/परिषदा/चर्चासत्र यासाठी उपस्थित राहणाऱ्या साधनव्यक्तींचा मानधन व प्रवासखर्च विद्यापीठ नियमानुसार देय राहील.

साधन व्यक्तींना राज्यस्तरीय कार्यशाळा/चर्चासत्र/परिषदेस उपस्थित राहण्यासाठी स्वत:चे किंवा भाडेतत्वावरील वाहनखर्च विद्यापीठ नियमानुसार देय राहील. साधन व्यक्तीने स्वत:च्या वाहनाने प्रवास केला असल्यास, RCTC ची झेरॉक्स प्रत, टोलची बिले, प्रवास भत्याच्या अर्जाला जोडून माहिती भरुन देणे आवश्यक आहे. अथवा भाडेतत्वावर गाडीने प्रवास केला असल्यास ट्रॅव्हल्स् एजन्सीची देयके विद्यापीठ नियमानुसार अदा केली जातील. सदरची देयके टोलबिलासहित जोडणे आवश्यक आहे व या देयकावर प्राचार्य/संचालक यांची स्वाक्षरी आवश्यक आहे.

साधन व्यक्तींना राष्ट्रीय व आंतराष्ट्रीय पातळीवरील कार्यशाळा/चर्चासत्र/परिषदांसाठी इकॉनॉमी क्लास विमान प्रवासखर्च विद्यापीठ नियमानुसार देय राहील. इकॉनॉमी क्लास विमानप्रवासाच्या देयकासोबत विमान तिकिट, मूळ बोर्डींग पास, पासपोर्ट व व्हिसाच्या छायाप्रती तसेच ती व्यक्ती ज्या संस्थेत कार्यरत आहे त्या संस्थेच्या ओळखपत्राची प्रत सादर करणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे भारतामधील व्यक्ती जर नोकरी अथवा व्यवसाय निमित्ताने

परदेशात राहात असेल तर ती व्यक्ती राहात असलेल्या देशाच्या नागरिकत्वाचा पुरावा विमानप्रवासाच्या देयकासोबत सादर करणे आवश्यक आहे. तसेच साधन व्यक्तीने निवासस्थानापासून ते विमानतळ ते कार्यस्थळ असा प्रवास टॅक्सीने केला असल्यास, त्याची मूळ देयके सादर केल्यानंतरच टॅक्सी प्रवासाची देयके अदा केली जातील. तसेच रेल्वे अथवा बस प्रवासाची देयके सादर करताना मूळ तिकिटे सादर करणे आवश्यक आहे व या सर्व देयकांवर प्राचार्य/संचालक यांची स्वाक्षरी आवश्यक आहे.

- महाविद्यालये/परिसंस्थांनी कार्यशाळा/चर्चासत्रे/परिषद यांचे आयोजन त्याच शैक्षणिक वर्षाच्या फेब्रुवारी अखेर पर्यंतच करुन व त्यांचे हिशेब विद्यापीठाने आयोजित केलेल्या लेखा शिबीरात स्विकारले जातील. **लेखा शिबिरानंतर प्राप्त होणारी देयके स्वीकारली जाणार नाहीत.**

- प्रस्तावात नमूद केलेल्या कार्यशाळा/चर्चासत्रे/परिषदेच्या वेळापत्रकात किंवा साधनव्यक्तींच्या नावात (Resource Person) जर बदल करावयाचा असल्यास त्यास कार्यशाळा/चर्चासत्रे/परिषद आयोजन तारखेपुर्वी विद्यापीठाची पूर्व मान्यता घेणे आवश्यक राहिल. तसेच कार्यशाळा/चर्चासत्रे/परिषदेस उपस्थित साधन व्यक्तींना सहभागी व्यक्ती म्हणून दाखविता येणार नाही.

- ज्या विषयाची कार्यशाळा/चर्चासत्रे/परिषद आयोजित केली असेल त्या विषयाशी संबंधित नसलेल्या व्यक्तींना सहभागी व्यक्ती म्हणून दाखविल्याचे निदर्शनास आल्यास खर्चाची देयके स्विकारली जाणार नाहीत.

- कार्यशाळा/चर्चासत्रे/परिषद आयोजित केल्यानंतर त्याची देयके विद्यापीठास सादर करताना त्यासोबत व्यासपीठ व त्यावरील बॅनर तसेच सभागृहात उपस्थित सहभागी व्यक्ती यांचे स्पष्ट छायाचित्र (फोटोग्राफ) जोडणे आवश्यक आहे.

- कार्यशाळा/चर्चासत्रे/परिषदेस उपस्थित सहभागी व्यक्तींच्या दोन दिवस उपस्थित असल्याबाबतची स्वाक्षरी दोन दिवसांच्या स्वतंत्र उपस्थित पत्रकावर घेणे अनिवार्य आहे. जर सहभागी व्यक्तींची एकच दिवस उपस्थित असल्याबाबतची स्वाक्षरी असेल तर कोणत्याही खर्चाची देयके स्विकारली जाणार नाहीत.

- विषयाशी संबंधित नसलेल्या औद्योगिक क्षेत्रातील सहभागी व्यक्तींना कार्यशाळा/चर्चासत्रे/ परिषदेमध्ये सहभागी व्यक्ती म्हणून दाखविल्यास संबंधित महाविद्यालय/परिसंस्थांची देयके स्विकारली जाणार नाहीत.

- महाविद्यालय/परिसंस्थेने राष्ट्रीय अथवा आंतरराष्ट्रीय कार्यशाळा/चर्चासत्रे/ परिषदेचे आयोजन केल्यानंतर त्याचे कार्यवृत्तांत अहवाल (प्रोसीडींग) छापणे अनिवार्य आहे.

- राष्ट्रीय स्तरावरील ज्या विषयाच्या कार्यशाळा/चर्चासत्रे/परिषदेचे आयोजन करण्यास मंजूरी दिली असेल परंतू सदर महाविद्यालय/परिसंस्थेत संबंधित विषयाच्या पदव्युत्तर अभ्यासक्रमास

शुन्य विद्यार्थी संख्या असेल किंवा अभ्यासक्रम बंद असेल अशा महाविद्यालय/ परिसंस्थेंने राष्ट्रीय स्तरावरील कार्यशाळा/चर्चासत्रे/परिषदेचे आयोजन करु नये. तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावरील ज्या विषयाच्या कार्यशाळा/चर्चासत्रे/परिषदेचे आयोजन करण्यास मंजूरी दिली असेल परंतू सदर महाविद्यालय/परिसंस्थेत संबंधित विषयाच्या संशोधन केंद्राची मान्यता नसेल अथवा मान्यता काढून घेतलेली असेल किंवा शुन्य विद्यार्थी संख्या असेल तर संबंधित महाविद्यालय/परिसंस्थेने आंतरराष्ट्रीय स्तरावरील कार्यशाळा/चर्चासत्रे/ परिषदेचे आयोजन करू नये अन्यथा महाविद्यालय/परिसंस्थेच्या कोणत्याही खर्चाची देयके मंजूर केली जाणार नाहीत.

- कार्यशाळा/चर्चासत्रे/परिषदेचे आयोजन करण्यासाठी प्रस्ताव सादर करताना प्रस्तावा सोबत संबंधित महाविद्यालय/परिसंस्थेच्या प्राचार्य/संचालक यांच्या मान्यतेची प्रत जोडणे अनिवार्य आहे. सदर महाविद्यालय/परिसंस्थेस मान्यताप्राप्त प्राचार्य/संचालक नसेल तर अर्थसहाय्य मंजुर करण्यात येणार नाही.

- एखादया महाविद्यालयास/परिसंस्थेस जर कार्यशाळा/चर्चासत्रे/परिषद दर्जा बदल करावयाचा असेल म्हणजे उदा. राज्यस्तरीय आयोजन करण्यासाठी मिळालेल्या अनुदानातून राष्ट्रीय अथवा आंतरराष्ट्रीय कार्यशाळा/चर्चासत्रे/परिषद यांचे आयोजन करणे, तर त्यास सदर बदल करण्यास परवानगी देण्यात येणार नाही. जर महाविद्यालयाने/परिसंस्थेने स्वत:हूनच दर्जा बदल केल्यास त्यांचे हिशोब स्विकारण्यात येणार नाहीत.

- ज्या महाविद्यालय/परिसंस्थेने विद्यापीठाकडे महाविद्यालय/परिसंस्था बंद करण्यासाठी अर्ज केला असेल अशा महाविद्यालय/परिसंस्थेस कार्यशाळा/चर्चासत्रे/परिषद आयोजन करण्यासाठी परवानगी देण्यात येणार नाही. जर अशा महाविद्यालयांनी/परिसंस्थांनी कार्यशाळा/चर्चासत्रे/ परिषदेचे आयोजन केल्यास त्यांचे हिशोब स्विकारण्यात येणार नाहीत.

- कार्यशाळा/चर्चासत्रे/परिषदेचे आयोजन करण्यासाठी प्रस्ताव सादर करताना जर एखाद्या महाविद्यालय/संस्थेने जर प्रस्तावामध्ये चुकीची, दिशाभूल करणारी अथवा खोटी माहिती भरल्यास संबंधित महाविद्यालय/संस्थेस गुणवत्ता सुधार योजनेचा लाभ घेण्यास पुढील तीन वर्ष अपात्र समजण्यात येईल.

**********

# विशेष प्रोत्साहनपर अर्थसहाय्य

१०० वर्ष पूर्ण केलेल्या संलग्न महाविद्यालय/मान्यताप्राप्त परिसंस्थांसाठी शैक्षणिक वर्ष २०१६–१७ पासून विशेष अर्थसहाय्य योजना लागू करण्यात आली आहे. ज्या महाविद्यालये/परिसंस्थांनी चालू शैक्षणिक वर्षात १०० व्या महोत्सवी वर्षात पदार्पण केलेले असेल, अशा संबंधित महाविद्यालये/परिसंस्थांना त्याच शैक्षणिक वर्षात विविध राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय शैक्षणिक उपक्रमांचे आयोजन करण्यासाठी विशेष प्रोत्साहनपर रु.१० लाख इतके अर्थसहाय्य (विद्यापीठ हिस्सा ७५ टक्के व महाविद्यालयाचा हिस्सा २५ टक्के) संबंधित महाविद्यालये/परिसंस्थांनी सादर केलेल्या प्रस्तावानुसार देण्यात येईल.

सदर अर्थसहाय्यासाठी प्रस्ताव सादर करताना खालील अटीं व संबंधीत कागदपत्रांची पूर्तता करणे आवश्यक आहे.

१. महाविद्यालय/परिसंस्था सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी कायम संलग्नीत असल्याचे विद्यापीठाचे मान्यता पत्र तसेच नॅककडून महाविद्यालय/परिसंस्थेचे मुल्यांकन/पुर्नमुल्यांकन झाल्याचे विहित मुदतीतील प्रमाणपत्र.

२. महाविद्यालय/परिसंस्थेमध्ये कायमस्वरुपी/प्रभारी विद्यापीठ मान्यताप्राप्त प्राचार्य/संचालक असल्याचे मान्यता पत्र.

३. महाविद्यालय/परिसंस्थेची स्थापना ज्या वर्षी झालेली आहे त्या वर्षीचे विद्यापीठ मान्यता पत्र.

४. संबंधित महाविद्यालय/परिसंस्थेवर विद्यापीठ पातळीवर कोणतीही गंभीर स्वरुपाची कारवाई झालेली नसावी किंवा सुरु नसावी.

५. सदर महाविद्यालय/परिसंस्थेने विद्यापीठाचा सर्व प्रकारचा प्रोरेटा, संलग्नीकरण शुल्क, खर्चाचे सर्व हिशेब सादर केलेले असणे आवश्यक आहे.

६. महाविद्यालय/परिसंस्थेच्या महोत्सवी वर्षात वर्षभर राबविण्यात येणाऱ्या शैक्षणिक उपक्रमाची रुपरेषा व खर्चाचे अंदाजपत्रक.

७. सदर योजनेच्या अंतर्गत मंजुर रकमेचा विनियोग त्याच महोत्सवी वर्षात करणे बंधनकारक राहील.

**********

# क्रिडा साहित्य

- महाविद्यालय/परिसंस्थेच्या विद्यार्थी संख्येच्या प्रमाणात व उपलब्ध सोयीनुसार कमाल रु.१ लाख एकुण खर्चाच्या ७५:२५ प्रमाणानुसार अर्थसहाय्य मंजूर करण्यात येईल. सदरचे अर्थसहाय्य दोन वर्षातून एकदा मंजूर करण्यात येईल. (उदा. ज्या महाविद्यालय/परिसंस्थांना २०१७—२०१८ मध्ये क्रिडा साहित्यासाठी अर्थसहाय्य मंजूर करण्यात आलेले आहे, अशा महाविद्यालय/परिसंस्थांना २०१९—२०२० मध्ये प्रस्ताव दाखल करता येईल.)

- फक्त भांडवली स्वरूपातील क्रिडा साहित्य या योजनेअंतर्गत खरेदी करता येईल.

- सदर क्रिडा साहित्यासाठी इतर कोणत्याही संस्थेकडून/वित्तीय विभागाकडून अर्थसहाय्य घेतलेले नसावे किंवा यापूर्वी विद्यापीठाकडून त्याच साहित्यासाठी अर्थसहाय्य घेतलेले नसावे. यापूर्वी त्याच साहित्यासाठी अर्थसहाय्य घेतले आहे असे निदर्शनास आल्यास सदर वर्षामध्ये मंजूर केलेले अर्थसहाय्य हे रद्द करण्यात येईल व याची सर्वस्वी जबाबदारी संबधित महाविद्यालय/परिसंस्थेवर राहील.

- क्रिडा साहित्य अर्थसहाय्यासाठी प्रस्ताव सादर करताना महाविद्यालय/परिसंस्थेमध्ये मान्यताप्राप्त (कायम किंवा प्रभारी) प्राचार्य/संचालक असणे बंधनकारक आहे. तसेच क्रिडा साहित्य खरेदीसाठी अनुदान मंजूर करताना महाविद्यालयांमध्ये क्रिडागंण, व्यायामशाळा व मान्यताप्राप्त शारिरिक शिक्षण संचालक असणे बंधनकारक आहे. व्यावसायिक महाविद्यालये / परिसंस्था (अभियांत्रिकी / औषधनिर्माणशास्त्र / विधी / व्यवस्थापनशास्त्र/ शिक्षणशास्त्र महाविद्यालये) यांचेकरिता किमान हंगामी स्वरूपातील नियुक्त किंवा तर्दथ मान्यता असलेले शारिरिक शिक्षण संचालक आवश्यक आहे.

- क्रिडा साहित्य खरेदी अनुदानासाठी प्रस्ताव सादर करताना प्रस्तावासोबत संबंधीत महाविद्यालय/संस्थेतील विद्यार्थ्यांनी मागील शैक्षणिक वर्षामध्ये **किमान तीन व्यक्तिगत खेळामध्ये व दोन सांघिक खेळांमध्ये** आंतर—महाविद्यालयीन पातळीवर सहभाग घेतला असणे आवश्यक आहे, त्या संदर्भातील सहभागी विद्यार्थ्यांची नावे, त्यांना मिळालेल्या प्रशस्तीपत्राची प्रत तसेच सहभागी विद्यार्थ्यांची क्रिडा झोनल अध्यक्ष/सचिव यांनी सांक्षाकीत केलेली यादी व इतर कागदपत्रे प्रस्तावासोबत जोडणे आवश्यक आहे.

- महाविद्यालय/परिसंस्थेचे स्वतंत्र खेळाचे मैदान व क्रिडा साहित्य ठेवण्यासाठी स्वतंत्र हॉल असणे अनिवार्य आहे.

- खेळाचे साहित्य खरेदी करण्यासाठी वेगवेगळया किमान तीन कंपन्यांचे कोटेशन व तुलनात्मक तक्ता (Comparitive Chart) इ. प्राचार्याच्या सही व शिक्क्यासह प्रस्तावासोबत जोडणे आवश्यक आहे.

- महाविद्यालय/परिसंस्थेने क्रिडा साहित्य खरेदी केल्यानंतर स्टॉक रजिस्टर अद्ययावत ठेवणे आवश्यक आहे. जर एखादे क्रिडा साहित्य खराब झाले. तर तशी नोंद स्टॉक रजिस्टर मध्ये ठेवावी.

- क्रिडा साहित्यावर स्टॉक रजिस्टर नोंदणी क्रमांक, योजनेचे नाव व खरेदी करण्यात आलेले महिना व वर्ष याची नोंद करावी.

**************

## कार्यालयीन, शैक्षणिक व प्रयोगशाळा उपकरणे व दिव्यांग व्यक्तींसाठी उपयोगी वस्तु खरेदी

- या योजनेअंतर्गत संलग्न महाविद्यालय/मान्यताप्राप्त परिसंस्थांच्या प्रस्तावानुसार 'कार्यालयीन, शैक्षणिक व प्रयोगशाळा उपकरणे व अपंग/दिव्यांग व्यक्तींसाठी उपयोगी वस्तु खरेदी' याअंतर्गत मार्गदर्शकतत्वांच्या अधिन राहून जास्तीत जास्त रुपये एक लाख इतके अर्थसहाय्य एकुण खर्चाच्या ७५:२५ प्रमाणानुसार मंजूर करण्यात येईल.

- प्रयोगशाळेतील काचेची उपकरणे, रसायने, जनरेटर, युपीएस, युपीएस बॅटरीज्, इ.पी.बी. एक्स. सिस्टीम, फर्निचर, व्हिडीओ कॅमेरा, लॅपटॉप, कॉम्प्युटर हार्डडिस्क तसेच इतर प्रकारच्या उपभोग्य (Consumable) वस्तूंसाठी अनुदान मंजूर केले जाणार नाही.

- गुणवत्ता सुधार योजनेअंतर्गत महाविद्यालय/परिसंस्थेने पूर्वी मिळालेल्या अर्थसहाय्यातून एखादे कार्यालयीन, शैक्षणिक व प्रयोगशाळा उपकरण खरेदी खरेदी केलेले असल्यास तेच उपकरण महाविद्यालय/परिसंस्थेस तीन वर्षापर्यत पुन:श्च खरेदी करता येणार नाही.

- खरेदी करण्यात येणारी कार्यालयीन, शैक्षणिक व प्रयोगशाळा उपकरणे व अपंग/दिव्यांग व्यक्तींसाठी उपयोगी वस्तु यासाठी तीन अधिकृत पुरवठाधारकांचे कोटेशन व तुलनात्मक तक्ता इ. प्राचार्य/संस्थाचालकाच्या सही व शिक्क्यासह प्रस्तावासोबत जोडणे आवश्यक आहे.

- महाविद्यालय/परिसंस्थेने कार्यालयीन, शैक्षणिक व प्रयोगशाळा उपकरणे व अपंग/दिव्यांग व्यक्तींसाठी उपयोगी वस्तु खरेदी केल्यानंतर स्टॉक रजिस्टर अद्ययावत ठेवणे आवश्यक आहे. जर एखादे कार्यालयीन, शैक्षणिक व प्रयोगशाळा उपकरण खराब झाले. तर तशी नोंद स्टॉक रजिस्टर मध्ये ठेवावी.

- कार्यालयीन, शैक्षणिक व प्रयोगशाळा उपकरणे व अपंग/दिव्यांग व्यक्तींसाठी उपयोगी वस्तुवर स्टॉक रजिस्टर नोंदणी क्रमांक, योजनेचे नाव व खरेदी करण्यात आलेले महिना व वर्ष याची नोंद करावी.

**************

# बांधकाम

गुणवत्ता सुधार योजनेअतंर्गत संलग्न महाविद्यालय/मान्यताप्राप्त परिसंस्थांना पुढील नमूद केलेल्या बांधकाम प्रकारांसाठी १) विद्यार्थी, विद्यार्थीनीसाठी व दिव्यांग व्यक्तींसाठी प्रसाधनगृह २) महिला कर्मचाऱ्यांसाठी सर्व सुविधांनीयुक्त स्वतंत्र कक्ष ३) अनिवासी विद्यार्थी केंद्र ४) पार्कींग शेड ५) पिण्याच्या पाण्याची टाकी ६) कॅफेटेरिया ७) जुन्या इमारतीमध्ये दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी रॅम्प बांधणे ८) सौर—ऊर्जा उपकरणे इ. करिता मार्गदर्शकतत्वांस अनुसरून वरीलपैकी कोणत्याही एकाच बांधकाम प्रकारासाठी किंवा सौर—ऊर्जा उपकरणे बसविण्यासाठी प्रस्ताव सादर करता येईल. बांधकामासाठी तीन वर्षातून एकदा अर्थसहाय्य मंजूर झाल्यानंतर तीन वर्षाच्या आत बांधकाम पूर्ण करून हिशेब सादर करणे अनिवार्य आहे. सदर हिशेब सादर केल्यानंतरच बांधकामासाठी नव्याने प्रस्ताव सादर करता येईल. (उदा. ज्या महाविद्यालये/परिसंस्थांना आर्थिक वर्ष २०१६—१७ मध्ये बांधकामासाठी अर्थसहाय्य मंजूर करण्यात आलेले आहे व बांधकाम पूर्ण करून सदर महाविद्यालय/परिसंस्थेने त्याचे हिशोब विद्यापीठास सादर केलेले आहेत, अशा महाविद्यालये/परिसंस्थांना आर्थिक वर्ष २०१९—२० मध्ये प्रस्ताव सादर करता येतील).

सदर अर्थसहाय्य एकूण खर्चाच्या **७५:२५** प्रमाणानुसार (७५% विद्यापीठ हिस्सा २५% महाविद्यालय/परिसंस्थेचा हिस्सा) मंजूर करण्यात येईल. सौर—ऊर्जा उपकरणे यासाठी स्वतंत्र मार्गदर्शक तत्वे पुढे दिलेली आहेत. त्यानुसारच सौर—ऊर्जा उपकरणेसाठी प्रस्ताव सादर करता येईल. पार्किग शेड, पिण्याच्या पाण्याची टाकी, दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी रॅम्प वगळता इ. नमूद केलेली बांधकामे किमान ५०० स्क्वे.फुट. आर.सी.सी. असणे अनिवार्य आहे.

गुणवत्ता सुधार योजनेअंतर्गत ज्या महाविद्यालये/परिसंस्थांना आर्थिक वर्ष २०१६—१७ किंवा त्यापूर्वी बांधकामासाठी अर्थसहाय्य मंजूर झालेले आहे व ज्या महाविद्यालये/परिसंस्थांनी उचल रक्कम देखील घेतलेली आहे व विहीत मुदतीत बांधकाम केलेले नाही अथवा बांधकामाचे हिशेब सादर केलेले नाहीत अशी सर्व संबंधित महाविद्यालये/परिसंस्था बांधकाम अर्थसहाय्यास पात्र राहणार नाहीत.

या योजनेअंतर्गत ज्या महाविद्यालये/परिसंस्थांना बांधकामासाठी अर्थसहाय्य मंजूर झालेले आहे त्या महाविद्यालये/परिसंस्थांनी बांधकाम मुदती मधील प्रगती अहवाल (progress report) दर वर्षी मार्च अखेर संबंधित वास्तुविशारद यांच्या सही व शिक्क्यासह मा. प्राचार्य यांच्या मार्फत नियोजन व विकास विभागास सादर करावा.

बांधकामासाठीचा निधी तीन वर्षातून एकदा मंजूर करण्यात येईल मात्र विद्यापीठाने अर्थसहाय्य दिलेल्या याच बांधकामासाठी इतर वित्तीय संस्थांकडून अर्थसहाय्य घेतलेले नसावे. तसेच इतर संस्था/वित्तीय संस्थेकडून अर्थसहाय्य घेवून बांधलेल्या इमारतीमध्येच गुणवत्ता सुधार योजने अंतर्गत पुन्हा अर्थसहाय्य घेवून बांधकाम करण्यास परवानगी दिली जाणार नाही. जर अशा इमारतीमध्ये गुणवत्ता सुधार योजने अंतर्गत बांधकाम केलेले आढळून आल्यास संबंधीत महाविद्यालय/परिसंस्थेचे हिशेब स्विकारले जाणार नाही. या योजनेअतंर्गत मंजूर झालेल्या बांधकाम अर्थसहाय्यातून फर्निचर व उपकरणे घेण्यास परवानगी दिली जाणार नाही.

बांधकामाच्या अर्थसहाय्यासाठी विद्यापीठाने विहित केलेल्या नमुन्यामध्ये आवश्यक माहितीसह विहित मुदतीत प्रस्ताव सादर करणे आवश्यक आहे. या अर्थसहाय्यासाठी अपंग विद्यार्थ्यांसाठी रॅम्प वगळता कमाल मर्यादा रूपये ५ लाख अशी आहे व रॅम्प बांधण्यासाठी कमाल रू.५०,०००/— अशी आहे.

**नवीन बांधकामामध्ये प्रामुख्याने खालील प्रकारच्या बांधकामांचा समावेश असावा.**

१) **विद्यार्थी व विद्यार्थिनीसाठी अनिवासी विद्यार्थी केंद्रः—** विद्यार्थी/विद्यार्थिनींना बसण्यासाठी स्वतंत्र व्यवस्था असावी तसेच पिण्याच्या पाणी आणि प्रसाधनगृह इ. सुविधा असाव्यात. यामध्ये कुठल्याही प्रकारचे फर्निचर व उपकरणे घेण्यास परवानगी दिली जाणार नाही.

२) **विद्यार्थी, विद्यार्थिनीसाठी व दिव्यांग व्यक्तीसाठी प्रसाधनगृहे :—** कमीतकमी पाच टॉयलेट ब्लॉक पैकी दिव्यांग व्यक्तींसाठी दोन टॉयलेट ब्लॉक असणे आवश्यक आहे. प्रसाधनगृहाच्या आतील भिंतीना किमान सहा फुटांपर्यंत टाईल्स लावणे बंधनकारक आहे.

३) **महिला कर्मचाऱ्यांसाठी सुसज्ज स्वतंत्र कक्ष** — यामध्ये प्रामुख्याने प्रसाधनगृह, पिण्याचे पाणी इत्यादी गोष्टींचा समावेश असणे आवश्यक आहे.

४) **पार्किंग शेड** — पार्किंग शेड बांधलेल्या ठिकाणची जमीन पेविंग ब्लॉक किंवा सिंमेट कॉक्रीटने आच्छादलेली असावी. सायकली व दुचाकी गाडया वाहनतळावर व्यवस्थिपणे लावण्यासाठी रंगांच्या पट्टयांची आखणी, सायंकालीन वर्गांच्या दृष्टीने वाहनतळावर करावी लागणारी प्रकाश व्यवस्था, वाहनतळाच्या नियमांबाबतीत योग्य त्या सूचनांचे फलक इ. व्यवस्था असावी.

**५) पिण्याच्या पाण्याची टाकी बांधणे—** टाकीचे बांधकाम आर.सी.सी. मध्येच असणे आवश्यक आहे.

**६) कॅफेटेरिया —** पिण्याच्या पाण्याची व्यवस्था असणे आवश्यक आहे. तसेच यामध्ये कुठल्याही प्रकारचे फर्निचर व उपकरणे घेण्यास परवानगी दिली जाणार नाही.

**७) जुन्या इमारतीमध्ये अपंग विद्यार्थ्यांसाठी रॅम्प बांधणे —** सदर रॅम्प बांधण्यासाठी कमाल रू.५०,०००/— (विद्यापीठ हिस्सा ७५% व महाविद्यालय हिस्सा २५%) मंजूर करण्यात येईल. (सदरील अर्थसहाय्य हे फक्त जुन्या इमारतीमध्येच रॅम्प बांधण्यासाठी लागू राहिल)

**अर्थसहाय्यासाठी प्रस्तावासोबत खालील बाबींची पूर्तता करणे अनिवार्य आहे.**

१) विद्यापीठाकडे बांधकाम अर्थसहाय्यासाठी प्रस्ताव पाठविताना प्रस्तावासोबत महाविद्यालयाचे प्राचार्य/परिसंस्थेचे संचालक व संस्थेचे अध्यक्ष/सचिव यांचे महाविद्यालयाच्या/ परिसंस्थेच्या लेटरहेडवरील संयुक्त सहीचे हमीपत्र जोडणे आवश्यक आहे.

२) नविन बांधकामासाठी प्रस्ताव सादर करताना मान्यताप्राप्त वास्तुविशारदाचा (आर्किटेक्ट) बांधकामाचा आराखडा अथवा महानगरपालिका/नगरपरिषद/ग्रामपंचायत यांचेकडून नकाशा मंजूर केला असल्यास त्यांची प्रत व बांधकामाचे कोटेशन इ. प्रस्तावासोबत जोडावे. तसेच संबंधित बांधकाम पूर्ण झाल्यानंतर त्याबाबतचे हिशोब विद्यापीठास सादर करताना त्यासोबत बांधकामाचा आराखडा, महानगरपालिका/ नगरपरिषद/ग्रामपंचायत यांचा मंजूर नकाशा व बांधकाम पूर्णत्वाचा दाखला जोडणे अनिवार्य आहे. पार्कींग शेड, पिण्याच्या पाण्याची टाकी व अपंग विद्यार्थ्यांसाठी रॅम्प इ. बांधकाम पूर्णत्वा नंतर हिशेब सादर करताना वास्तुविशारदाचा (आर्किटेक्ट) बांधकाम पूर्णत्वाचा दाखला जोडला तरी चालेल.

************

## गुणवत्ता सुधार योजनेअंतर्गत देण्यात येणाऱ्या अर्थसहाय्यासाठी सामाईक नियमावली

१. महाविद्यालय/परिसंस्थेला राज्य, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरील कार्यशाळा/ चर्चासत्र/परिषदेचे आयोजन, क्रीडा साहित्य व कार्यालयीन, शैक्षणिक व प्रयोगशाळा उपकरणे व दिव्यांग व्यक्तींसाठी उपयोगी वस्तु खरेदी, तसेच नवीन बांधकाम व सौर–ऊर्जा उपकरणे खरेदी, तसेच फक्त आदिवासी विभागातील महाविद्यालय/ परिसंस्थांच्या स्थानिक गरजा लक्षात घेवून त्यांना गरजेवर आधारित उपक्रमांतर्गत विद्यार्थी/विद्याथीनींसाठी सायकल खरेदी इत्यादिसाठी एकूण खर्चाच्या ७५:२५ प्रमाणानुसार अर्थसहाय्य मंजूर करण्यात येईल.

२. विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालये/मान्यताप्राप्त परिसंस्था जर संबंधित महाविद्यालयाच्या/परिसंस्थेच्या स्वतंत्र अभिमत/खाजगी विद्यापीठाशी (महाविद्यालय/ परिसंस्था विद्यापीठाशी संलग्नीत असलेल्या नावाने अथवा बदलेल्या नावाने) संलग्नीत झाले असेल तर अशा अभिमत/खाजगी विद्यापीठाशी संलग्नीत महाविद्यालय/ परिसंस्थेला गुणवत्ता सुधार योजनेअंतर्गत प्रस्ताव दाखल करता येणार नाही.

३. ज्या महाविद्यालय/परिसंस्थेने विद्यापीठाकडे महाविद्यालय/परिसंस्था बंद करण्यासाठी अर्ज सादर केला असेल अशा महाविद्यालय/परिसंस्थेचा गुणवत्ता सुधार योजनेअंतर्गत अर्थसहाय्यासाठीचा मंजूर करण्यात येणार नाही. जर अशा महाविद्यालयांनी/परिसंस्थांनी या योजनेअंतर्गत कोणताही उपक्रम राबविल्यास त्यांचे हिशेब स्विकारण्यात येणार नाहीत.

४. ज्या महाविद्यालयात/परिसंस्थेत प्रथम वर्ष विद्यार्थी संख्या शून्य आहे अशा महाविद्यालय/परिसंस्थांना गुणवत्ता सुधार योजनेअंतर्गत अर्थसहाय्यासाठी प्रस्ताव सादर करता येणार नाही. अशा महाविद्यालयांनी/परिसंस्थांनी या योजनेअंतर्गत कोणताही उपक्रम राबविल्यास त्यांचे हिशेब स्विकारण्यात येणार नाहीत.

५. विद्यापीठ वार्षिक अहवाल सन २०१८—२०१९ ची माहिती देणे बंधनकारक आहे. नियोजन व विकास विभागाला वार्षिक अहवालाची माहिती जमा केल्याची पोहोच प्रत, त्याचप्रमाणे चालू शैक्षणिक वर्षाची AISHE व MIS ची माहिती भरली असल्याचे प्रमाणपत्र अथवा ना—हरकत प्रमाणपत्र, विद्यापीठ निधी (प्रोरेटा) क्रीडा विभाग, विद्यार्थी विकास मंडळ, शैक्षणिक प्रवेश विभाग, प्रोरेटा तसेच चालू शैक्षणिक वर्षाचे संलग्नीकरणाचे (नुतनीकरण) शुल्क भरलेल्या चलनाची छायाप्रत इ. प्रस्तावासोबत जोडणे आवश्यक आहे.

६. गुणवत्ता सुधार योजनेअंतर्गत प्रस्ताव सादर करताना जर एखाद्या महाविद्यालय/संस्थेने प्रस्तावामध्ये चुकीची, दिशाभूल करणारी अथवा खोटी माहिती सादर केल्यास संबंधित महाविद्यालय/संस्थेस गुणवत्ता सुधार योजनेचा लाभ घेण्यास पुढील तीन वर्ष अपात्र ठरविण्यात येईल.

७. महाविद्यालय/परिसंस्था सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी कायम संलग्नीत असल्याचे विद्यापीठाचे पत्र प्रस्तावासोबत जोडणे आवश्यक आहे.

८. महाविद्यालय/परिसंस्थेमध्ये कायमस्वरुपी/प्रभारी विद्यापीठ मान्यताप्राप्त प्राचार्य/संचालक असल्याचे मान्यता पत्र प्रस्तावासोबत जोडणे बंधनकारक आहे.

९. संबंधित महाविद्यालय/परिसंस्थेतील कायमस्वरूपी मान्यताप्राप्त/प्रभारी प्राचार्य/संचालक यांची सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ कार्यक्षेत्रातील एका महाविद्यालय/परिसंस्थेतून दुसऱ्या महाविद्यालय/परिसंस्थेत बदली झाली असेल तर संस्थेच्या बदली आदेशाची प्रत तसेच प्राचार्य/संचालक यांची बदली सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ कार्यक्षेत्राबाहेरून झाली असल्यास सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे मान्यता पत्र प्रस्तावासोबत जोडणे बंधनकारक आहे.

१०. संबंधित महाविद्यालय/परिसंस्थेवर विद्यापीठ पातळीवर कोणतीही गंभीर स्वरुपाची कारवाई झालेली नसावी किंवा सुरू नसावी.

११. सदर महाविद्यालय/परिसंस्थेने विद्यापीठाकडून उचल रकमेअंतर्गत घेतलेल्या रकमेचे सर्व खर्चाचे हिशेब विद्यापीठास सादर केलेले असणे आवश्यक आहे.

१२. क्रीडा साहित्य व  कार्यालयीन, शैक्षणिक व प्रयोगशाळा उपकरणे व दिव्यांग व्यक्तींसाठी उपयोगी वस्तु खरेदीसाठी कोणत्याही संस्थेकडून/वित्तीय विभागाकडून

अर्थसहाय्य घेतलेले नसावे किंवा यापूर्वी विद्यापीठाकडून त्याच साहित्यासाठी अर्थसहाय्य घेतलेले नसावे. यापूर्वी त्याच साहित्यासाठी अर्थसहाय्य घेतले आहे असे निदर्शनास आल्यास सदर वर्षामध्ये मंजूर केलेले अर्थसहाय्य हे रद्द करण्यात येईल व पुढील तीन वर्षांपर्यंत अशा महाविद्यालय/परिसंस्थांना क्रीडा साहित्य व कार्यालयीन, शैक्षणिक व प्रयोगशाळा उपकरणे व दिव्यांग व्यक्तींसाठी उपयोगी वस्तु खरेदी अनुदानासाठी अपात्र ठरविण्यात येईल. ज्या साहित्य खरेदीसाठी अनुदान मंजूर केले आहे, ते साहित्य खरेदी केल्यानंतर पुन्हा पुढील पाच वर्षे तेच साहित्य खरेदी करता येणार नाही, याची नोंद घ्यावी.

१३. क्रीडा साहित्य व कार्यालयीन, शैक्षणिक व प्रयोगशाळा उपकरणे व दिव्यांग व्यक्तींसाठी उपयोगी वस्तु इ. साहित्य खरेदी ही विद्यापीठाच्या अध्यादेश क्र. १५१ मधील तरतूदींनुसार वेगवेगळया किमान तीन पुरवठादारांचे/कंपन्यांचे दरपत्रक व तुलनात्मक तक्ता (Comparitive Chart) या सर्वांवर प्राचार्याची सही घेऊन शिक्क्यासह प्रस्तावासोबत जोडणे आवश्यक आहे.

१४. क्रीडा साहित्य व कार्यालयीन, शैक्षणिक व प्रयोगशाळा उपकरणे व दिव्यांग व्यक्तींसाठी उपयोगी वस्तु इ. साहित्य खरेदी करण्यासाठी तीन पुरवठादारांची/कंपन्यांची दरपत्रके जर ई—मेल वरुन मागविली असतील तर सदर दरपत्रके ज्या ई—मेल वरुन आले त्या ई—मेलच्या पहिल्या पानाची प्रत व दरपत्रक प्राचार्य/संचालकांच्या सही शिक्यासह प्रस्तावासोबत सादर करणे आवश्यक आहे.

१५. कमाल रु. ५०००/— च्या आतील क्रीडा साहित्य व कार्यालयीन, शैक्षणिक व प्रयोगशाळा उपकरणे व दिव्यांग व्यक्तींसाठी उपयोगी वस्तु इ. सर्व प्रकाराचे साहित्य खरेदी करता येणार नाही.

१६. महाविद्यालय/परिसंस्थेने क्रीडा साहित्य व कार्यालयीन, शैक्षणिक व प्रयोगशाळा उपकरणे व दिव्यांग व्यक्तींसाठी उपयोगी वस्तु खरेदी केल्यानंतर स्टॉक रजिस्टर अद्ययावत ठेवणे आवश्यक आहे. क्रीडा साहित्य व कार्यालयीन, शैक्षणिक व प्रयोगशाळा उपकरणे व दिव्यांग व्यक्तींसाठी उपयोगी वस्तू इ.साहित्यावर स्टॉक रजिस्टर नोंदणी क्रमांक, योजनेचे नाव व खरेदी करण्यात आलेले महिना व वर्ष याची नोंद करावी. जर एखादे साहित्य खराब झाले. तर तशी नोंद स्टॉक रजिस्टर मध्ये ठेवावी.

१७. खरेदी केलेल्या साहित्यावर स्टॉक रजिस्टर नोंदणी क्रमांक पुसला जाणार नाही अशा पध्दतीने ठळकपणे नोंदविणे आवश्यक आहे. तसेच असे साहित्य विद्यापीठाकडून प्राप्त अनूदानातून खरेदी केलेले आहे. त्यावर सुस्पष्ट व ठळकपणे विद्यापीठाचे व योजनेचे नांव नमूद करणे आवश्यक आहे.

१८. खरेदी केलेल्या क्रीडा साहित्य व कार्यालयीन, शैक्षणिक व प्रयोगशाळा उपकरणे व अपंग/दिव्यांग व्यक्तींसाठी उपयोगी वस्तु इ. साहित्याचे प्राचार्य/संचालक व क्रीडा संचालक यांचेबरोबर असलेले छायाचित्रे अंतिम हिशेब सादर करताना जोडणे आवश्यक

आहे. छायाचित्र साहित्यावर स्टॉक रजिस्टर नोंदणीचा उल्लेख दिसावा अशा पध्दतीने हवे.

१९. विद्यापीठाकडे नवीन बांधकाम व सौर—ऊर्जा उपकरणे, इ. अर्थसहाय्यासाठी प्रस्ताव पाठविताना प्रस्तावासोबत महाविद्यालयाचे प्राचार्य/परिसंस्थेचे संचालक व संस्थेचे अध्यक्ष/सचिव यांचे महाविद्यालयाच्या/परिसंस्थेच्या लेटरहेडवरील संयुक्त सहीचे हमीपत्र जोडणे आवश्यक आहे.

२०. खरेदी केल्या जाणाऱ्या उपकरणांची, तसेच सर्व प्रकारच्या कार्यशाळा/चर्चासत्रे/परिषदांची, बांधकामे, इत्यादींची रंगीत छायाचित्रे प्रस्तावास जोडणे अनिवार्य आहे.

२१. सादर केलेल्या प्रस्तावास मिळणारे अर्थसहाय्य हे संबंधीत अर्थशिर्षात शिल्लक असलेल्या रकमेच्या अधिन राहून याबाबत निर्णय घेतले जातील.

२२. कोणताही प्रस्ताव मंजूर/ना-मंजूर करण्याचे अधिकार विद्यापीठाकडे राखीव असतील.

************

## ऑनलाईन पध्दतीने प्रस्ताव सादर करण्याची लिंक खालील प्रमाणे

**unipune.ac.in-Home page – BOD Online – Login – For College Users – College Login & Password – Quality Improvement Programme**

ऑनलाईन पध्दतीने सादर केलेल्या प्रस्तावाची प्रत छापून (Printout) त्यासोबत मार्गदर्शकतत्वांमध्ये नमूद केल्याप्रमाणे आवश्यक ती सर्व कागदपत्रे जोडून विद्यापीठाच्या नियोजन व विकास विभागाकडे विहित मुदतीत सादर करावी. विहीत मुदतीनंतर, अपूर्ण कागदपत्रे जोडलेले, मार्गदर्शक तत्वांनुसार नसलेले प्रस्ताव विचारात घेतले जाणार नाहीत.

************

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

# गुणवत्ता सुधार योजनेंतर्गत विविध उपक्रम व योजना राबविण्यासाठी आदिवासी विभागातील महाविद्यालये/परिसंस्थांना देण्यात येणाऱ्या अर्थसहाय्याबाबतची मार्गदर्शकतत्वे

## (शैक्षणिक वर्ष २०१९—२०)

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या नियोजन व विकास विभागामार्फत गुणवत्ता सुधार योजनेअंतर्गत विविध उपक्रम व योजना राबविण्यासाठी अर्थसहाय्य दिले जाते. या योजनेअंतर्गत सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ संलग्न महाविद्यालये व मान्यताप्राप्त परिसंस्थांनी सादर केलेल्या प्रस्तावानुसार व गुणवत्ता सुधार योजनेच्या मार्गदर्शक तत्वांनुसार अर्थसहाय्य देण्यात येते. सदर आर्थिक वर्षात अर्थसहाय्यासाठी एकदाच ऑनलाईन पध्दतीने प्रस्ताव सादर करता येईल.

या योजनेअंतर्गत प्रामुख्याने, राज्य, राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय पातळीवरील कार्यशाळा/चर्चासत्रे/परिषदांचे आयोजन, क्रिडा साहित्य खरेदी, कार्यालयीन, शैक्षणिक व प्रयोगशाळा उपकरणे व अपंग/दिव्यांग व्यक्तींसाठी उपयोगी वस्तु खरेदी तसेच नवीन बांधकाम व त्या अंतर्गत सौर—ऊर्जा उपकरणे इत्यादिसाठी अर्थसहाय्य देण्यात येते. आदिवासी विभागातील महाविद्यालय/परिसंस्थांच्या स्थानिक गरजा लक्षात घेवून त्यांना गरजेवर आधारित उपक्रमांतर्गत विद्यार्थी/विद्यार्थीनींसाठी सायकल खरेदी याकरिता अर्थसहाय्य देण्यात येते.

- **कार्यशाळा/चर्चासत्रे/परिषदा :**

**अ) राज्यस्तरीय कार्यशाळा/चर्चासत्र/परिषदा** — फक्त नॅक/एन.बी.ए. मूल्यांकन अथवा पुनर्मूल्यांकन केलेली अथवा मूल्यांकन/पुनर्मूल्यांकनाकरीता अर्ज दाखल केलेली महाविद्यालये/परिसंस्था किंवा नॅक अथवा एन.बी.ए.मूल्यांकन करण्यासंदर्भात आवश्यक फी भरल्याच्या चलनाची सांक्षाकित प्रत प्रस्तावासोबत सादर केलेल्या महाविद्यालयांना/ परिसंस्थांना राज्यस्तरीय कार्यशाळा/चर्चासत्र/परिषदेच्या आयोजनासाठी प्रस्ताव सादर करता येईल.

**ब) राष्ट्रीय स्तरावरील कार्यशाळा/चर्चासत्र/परिषदा** — फक्त नॅक/ एन.बी.ए. मूल्यांकन अथवा पुनर्मूल्यांकन केलेली अथवा मूल्यांकन/पुनर्मूल्यांकनाकरीता अर्ज दाखल केलेली महाविद्यालये/परिसंस्था किंवा नॅक अथवा एन.बी.ए.मूल्यांकन करण्यासंदर्भात आवश्यक फी भरल्याच्या चलनाची सांक्षाकित प्रत प्रस्तावासोबत सादर केलेल्या महाविद्यालयांना/ परिसंस्थांना राष्ट्रीय स्तरावरील कार्यशाळा/चर्चासत्र/परिषदेच्या आयोजनासाठी प्रस्ताव सादर

करता येईल. तसेच एखाद्या व्यावसायिक अभ्यासक्रम चालवणा—या महाविद्यालय/परिसंस्थेने नॅक मुल्यांकन केले नाही परंतु ज्या विषयाचे एन.बी.ए. मूल्यांकन केलेले असेल त्याच विषयासाठी राष्ट्रीय कार्यशाळा/ चर्चासत्र/परिषदेच्या आयोजनासाठी प्रस्ताव सादर करता येईल. त्याचप्रमाणे ज्या विषयासाठी प्रस्ताव सादर करावयाचा आहे त्या विषयाच्या पदव्युत्तर अभ्यासक्रमास विद्यापीठाचे संलग्नीकरण असणे आवश्यक आहे. त्याबाबतचे पत्र प्रस्तावासोबत जोडणे अनिवार्य आहे.

**क) आंतरराष्ट्रीय स्तरावरील कार्यशाळा/चर्चासत्र/परिषदा—** फक्त नॅक/एन.बी.ए. मूल्यांकन अथवा पुनर्मूल्यांकन केलेली अथवा मूल्यांकन/पुनर्मूल्यांकनाकरीता अर्ज दाखल केलेली महाविद्यालये/परिसंस्था किंवा नॅक अथवा एन.बी.ए.मूल्यांकन करण्यासंदर्भात आवश्यक फी भरल्याच्या चलनाची सांक्षाकित प्रत प्रस्तावासोबत सादर केलेल्या महाविद्यालयांना/ परिसंस्थांना आंतरराष्ट्रीय स्तरावरील कार्यशाळा/चर्चासत्र/परिषदेच्या आयोजनासाठी प्रस्ताव सादर करता येईल. तसेच एखाद्या महाविद्यालय/परिसंस्थेने नॅक मुल्यांकन केले नाही परंतु ज्या विषयाचे एन.बी.ए. मूल्यांकन केलेले असेल त्याच विषयासाठी आंतरराष्ट्रीय कार्यशाळा/चर्चासत्र/परिषदेच्या आयोजनासाठी प्रस्ताव सादर करता येईल. त्याचप्रमाणे ज्या विषयासाठी प्रस्ताव सादर करावयाचा आहे त्या विषयाच्या पीएच.डी. संशोधन केंद्रास विद्यापीठाची मान्यता असणे आवश्यक आहे. त्याबाबतचे चालू वर्षाचे मान्यतापत्र प्रस्तावासोबत जोडणे अनिवार्य आहे.

| अ. क्र. | स्तर | कालावधी | कमीत कमी सहभागी व्यक्तींची संख्या | पैकी विद्यापीठ कार्यक्षेत्रा बाहेरील सहभागी व्यक्तींची संख्या | जास्तीत जास्त मंजुर अर्थसहाय्य रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|---|
| १ | राज्यस्तरीय | २ दिवस | ३० | किमान १० विद्यापीठ कार्यक्षेत्रा बाहेरील सहभागी व्यक्ती. | कमाल रु. १,००,०००/— |
| २ | राष्ट्रीय | २ दिवस | ३० | किमान १०राज्याबाहेरील सहभागी व्यक्ती व किमान १० विद्यापीठ कार्यक्षेत्रा बाहेरील सहभागी व्यक्ती. | कमाल रु. २,००,०००/— |
| ३ | आंतरराष्ट्रीय | २ दिवस | ३० | किमान ५ आंतरराष्ट्रीय सहभागी व्यक्ती व किमान १० राज्याबाहेरील सहभागी व्यक्ती (भारताबाहेरील व्यक्तींमध्ये दोन साधनव्यक्तीं व तीन संशोधन पेपर सादर करणाऱ्या व्यक्तींचा सहभाग अनिवार्य आहे). | कमाल रु. ३,००,०००/— |

**(टीप :महाविद्यालय/परिसंस्थेतील विद्यार्थ्यांना कार्यशाळा/चर्चासत्र/परिषदा यांमध्ये उपस्थित राहता येईल परंतु सहभागी व्यक्तींच्या यादीमध्ये विद्यार्थ्यांचा समावेश अनुदानासाठी अनुज्ञेय राहणार नाही)**

- संबंधित महाविद्यालय/परिसंस्थेमध्ये बाहेरील राज्यातील शिकत असलेल्या विद्यार्थ्यांना महाराष्ट्राबाहेरील सहभागी व्यक्ती म्हणून गृहीत धरता येणार नाही. तसेच परदेशातील भारतात शिक्षण, नोकरी, अथवा व्यवसायासाठी येणाऱ्या व्यक्तींना आंतरराष्ट्रीय सहभागी व्यक्ती म्हणून गृहीत धरता येणार नाही. त्याचप्रमाणे भारतामधून परदेशात शिक्षण अथवा नोकरीसाठी गेलेल्या व्यक्तींना परदेशी सहभागी व्यक्ती म्हणून ग्राहय धरता येणार नाही. त्याचप्रमाणे कार्यशाळा/चर्चासत्र/परिषदेच्या विषयाशी संबंधित नसलेल्या परदेशी व्यक्तींना परदेशी सहभागी व्यक्ती म्हणून ही धरता येणार नाही. अंतरराष्ट्रीय सहभागी व साधन व्यक्तीचा पासपोर्ट दुसऱ्या देशाचा असणे अनिवार्य आहे.

- एकाच संस्थेच्या विविध महाविद्यालये/परिसंस्थांनी एकाच ठिकाणी, एकाच दिवशी राज्य, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवरील कार्यशाळा/चर्चासत्र/परिषदांचे आयोजन करू नये. तसेच कार्यशाळा/चर्चासत्र/परिषदांचे आयोजन एकच दिवस केल्यास अर्थसहाय्य मंजूर केले जाणार नाही. परंतु दोन दिवसापेक्षा जास्त दिवस कार्यशाळा/चर्चासत्र/परिषदांचे आयोजन केल्यास फक्त दोन दिवसांचा खर्च अनुदानास पात्र राहिल.

- शैक्षणिक/औद्योगिक क्षेत्रामध्ये काम करणारी व्यक्ती जर कार्यशाळा/चर्चासत्रे/परिषदेस उपस्थित राहणार असेल तर ती व्यक्ती काम करित असलेल्या संबंधित महाविद्यालय/ परिसंस्थेच्या अथवा अस्थापनेच्या ओळखपत्राची दोन्ही बाजूची सुस्पष्ट प्रत संबंधितांनी स्व:स्वाक्षरीने साक्षांकित केलेली असली पाहिजे व संबंधित महाविद्यालय/ परिसंस्था/ अस्थापनेच्या लेटर हेडवर सदर व्यक्तीस कार्यशाळा/चर्चासत्रे/परिषदेस उपस्थित राहण्यासाठी कार्यमुक्त केल्याचा पुरावा, सहभागी व्यक्तीच्या पासपोर्ट व व्हिसाची प्रत कार्यशाळा/ चर्चासत्रे/परिषदेचे हिशेब सादर करताना सहभागी व्यक्तींच्या यादीबरोबर जोडणे आवश्यक आहे. औद्योगिक क्षेत्रामध्ये काम करणाऱ्या सहभागी व्यक्तींच्या ओळखपत्रावर फक्त कंपनीचे नाव व तेथे काम करणाऱ्या व्यक्तींचे नांव व फोटो असेल परंतू कंपनीचे ठिकाण दूरध्वनी क्रमांक, अधिकाऱ्यांची सही ओळखपत्रधारक व्यक्तीचे पद इत्यादी उल्लेख नसेल तर अशा प्रकारची ओळखपत्रे ग्राहय धरली जाणार नाहीत. अशा सहभागी व्यक्तींना ओळखपत्रासोबत संबंधित अस्थापनेचे पत्र जोडणे अनिवार्य आहे. जर कार्यशाळा/चर्चासत्रे/परिषदेस औद्योगिक क्षेत्रातील व्यक्ती उपस्थित राहणार असतील तर त्यांचे प्रमाण कार्यशाळा/चर्चासत्रे/परिषदेस विद्यापीठ कार्यक्षेत्रामधील तसेच विद्यापीठ कार्यक्षेत्रा बाहेरील एकूण सहभागी व्यक्तींच्या संख्येच्या प्रमाणात ५० टक्के पेक्षा जास्त असू नये.

- महाराष्ट्राबाहेरील एखादी व्यक्ती जर महाराष्ट्रात नोकरी निमित्ताने रहात असेल तर अशा व्यक्तीस महाराष्ट्राबाहेरील सहभागी व्यक्ती म्हणून गृहीत धरता येणार नाही.

- सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ कार्यक्षेत्रामधील संलग्न महाविद्यालय/परिसंस्थेंतील कार्यरत अध्यापकांनी जर विद्यापीठ कार्यक्षेत्राबाहेरील विद्यापीठात पीएच.डी. संशोधन पदवी साठी प्रवेश घेतला असेल तर अशा व्यक्तींना विद्यापीठ कार्यक्षेत्राबाहेरील अथवा महाराष्ट्राबाहेरील सहभागी व्यक्ती म्हणून गृहीत धरता येणार नाही.

- विद्यापीठ संलग्न महाविद्यालयाच्या संस्थेचे जर स्वतंत्र खाजगी विद्यापीठ असेल तर अशा खाजगी विद्यापीठातील व्यक्तींना सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ कार्यक्षेत्राबाहेरील सहभागी व्यक्ती म्हणून गृहीत धरता येणार नाही.

- विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रामधील संलग्न महाविद्यालये/परिसंस्थेमधील व्यक्तींना राज्याबाहेरील सहभागी व्यक्ती म्हणून गृहीत धरण्यात येणार नाही.

- राज्य, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवरील कार्यशाळा/परिषदा/चर्चासत्र आयोजन करण्यासाठी मंजूर करण्यात आलेल्या रकमेचा विनियोग खालीलप्रमाणे करण्यात यावा. यामध्ये विद्यापीठाचा हिस्सा ७५% आणि महाविद्यालये/परिसंस्थांचा हिस्सा २५% असा राहील.
  - अ. साधनव्यक्तींचा मानधन व प्रवासखर्च — ४०%
  - ब. संशोधन पत्रिका/लेख प्रकाशन — १०%
  - क. परिषदेसाठी आवश्यक शैक्षणिक साहित्य/छायांकित प्रत, सीडी इ.—२०%
  - ड. आतिथ्य खर्च, किरकोळ व आकस्मिक खर्च — ३०%

  उपरोक्त नमूद केलेल्या टक्केवारीनुसार अर्थसहाय्याचा विनियोग त्या त्या अर्थशीर्षासाठी करण्यात यावा. अन्य अर्थशीर्षासाठी खर्च करण्यात येवू नये. (उदा. अ—४०%, ब—१०%, क—२०%, ड—३०% यामध्ये त्या—त्या टक्केवारीपेक्षा जास्त खर्च देय होणार नाही किंवा त्या टक्केवारीमधील शिल्लक रक्कम इतरत्र वापरता येणार नाही).

- कार्यशाळा/परिषदा/चर्चासत्र यासाठी उपस्थित राहणाऱ्या साधनव्यक्तींना देण्यात येणारे मानधन खालीलप्रमाणे देय राहील.
  - ➢ **राज्यस्तरीय कार्यशाळा/परिषदा/चर्चासत्र** यासाठी उपस्थित राहणाऱ्या साधनव्यक्तीस **प्रति दिन प्रत्येकी रु.२०००/—** इतके मानधन देण्यात यावे.
  - ➢ **राष्ट्रीय स्तरावरील कार्यशाळा/परिषदा/चर्चासत्र** यासाठी उपस्थित राहणाऱ्या साधनव्यक्तीस **प्रति दिन प्रत्येकी रु.३०००/—** इतके मानधन देण्यात यावे.
  - ➢ **आंतरराष्ट्रीय पातळीवरील कार्यशाळा/चर्चासत्रे/परिषदा** यासाठी उपस्थित राहणाऱ्या **भारतातील साधन व्यक्तींना प्रति दिन प्रत्येकी रु.३०००/—** आणि **भारताबाहेरील साधन व्यक्तींना प्रति दिन प्रत्येकी रु.५०००/—** इतके मानधन देण्यात यावे.

उपरोक्त कार्यशाळा/परिषदा/चर्चासत्र यासाठी उपस्थित राहणाऱ्या साधनव्यक्तींचा मानधन व प्रवासखर्च विद्यापीठ नियमानुसार देय राहील.

साधन व्यक्तींना राज्यस्तरीय कार्यशाळा/चर्चासत्र/परिषदेस उपस्थित राहण्यासाठी स्वत:चे किंवा भाडेतत्वावरील वाहनखर्च विद्यापीठ नियमानुसार देय राहील. साधन व्यक्तीने स्वत:च्या वाहनाने प्रवास केला असल्यास, RCTC ची झेरॉक्स प्रत, टोलची बिले, प्रवास भत्याच्या अर्जाला जोडून माहिती भरुन देणे आवश्यक आहे. अथवा भाडेतत्वावर गाडीने प्रवास केला असल्यास ट्रॅव्हल्स् एजन्सीची देयके विद्यापीठ नियमानुसार अदा केली जातील. सदरची देयके टोलबिलासहित जोडणे आवश्यक आहे व या देयकावर प्राचार्य/संचालक यांची स्वाक्षरी आवश्यक आहे.

साधन व्यक्तींना राष्ट्रीय व आंतराष्ट्रीय पातळीवरील कार्यशाळा/चर्चासत्र/परिषदांसाठी इकॉनॉमी क्लास विमान प्रवासखर्च विद्यापीठ नियमानुसार देय राहील. इकॉनॉमी क्लास विमानप्रवासाच्या देयकासोबत विमान तिकिट, मूळ बोर्डींग पास, पासपोर्ट व व्हिसाच्या छायाप्रती तसेच ती व्यक्ती ज्या संस्थेत कार्यरत आहे त्या संस्थेच्या ओळखपत्राची प्रत सादर करणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे भारतामधील व्यक्ती जर नोकरी अथवा व्यवसाय निमित्ताने परदेशात राहात असेल तर ती व्यक्ती राहात असलेल्या देशाच्या नागरिकत्वाचा पुरावा विमानप्रवासाच्या देयकासोबत सादर करणे आवश्यक आहे. तसेच साधन व्यक्तीने निवासस्थानापासून ते विमानतळ ते कार्यस्थळ असा प्रवास टॅक्सीने केला असल्यास, त्याची मूळ देयके सादर केल्यानंतरच टॅक्सी प्रवासाची देयके अदा केली जातील. तसेच रेल्वे अथवा बस प्रवासाची देयके सादर करताना मूळ तिकिटे सादर करणे आवश्यक आहे व या सर्व देयकांवर प्राचार्य/संचालक यांची स्वाक्षरी आवश्यक आहे.

- महाविद्यालये/परिसंस्थांनी कार्यशाळा/चर्चासत्रे/परिषद यांचे आयोजन त्याच शैक्षणिक वर्षाच्या फेब्रुवारी अखेर पर्यंतच करुन व त्यांचे हिशेब विद्यापीठाने आयोजित केलेल्या लेखा शिबीरात स्विकारले जातील. **लेखा शिबिरानंतर प्राप्त होणारी देयके स्वीकारली जाणार नाहीत.**

- प्रस्तावात नमूद केलेल्या कार्यशाळा/चर्चासत्रे/परिषदेच्या वेळापत्रकात किंवा साधनव्यक्तींच्या नावात (Resource Person) जर बदल करावयाचा असल्यास त्यास कार्यशाळा/चर्चासत्रे/परिषद आयोजन तारखेपुर्वी विद्यापीठाची पूर्व मान्यता घेणे आवश्यक राहिल. तसेच कार्यशाळा/चर्चासत्रे/परिषदेस उपस्थित साधन व्यक्तींना सहभागी व्यक्ती म्हणून दाखविता येणार नाही.

- ज्या विषयाची कार्यशाळा/चर्चासत्रे/परिषद आयोजित केली असेल त्या विषयाशी संबंधित नसलेल्या व्यक्तींना सहभागी व्यक्ती म्हणून दाखविल्याचे निदर्शनास आल्यास खर्चाची देयके स्विकारली जाणार नाहीत.

- कार्यशाळा/चर्चासत्रे/परिषद आयोजित केल्यानंतर त्याची देयके विद्यापीठास सादर करताना त्यासोबत व्यासपीठ व त्यावरील बॅनर तसेच सभागृहात उपस्थित सहभागी व्यक्ती यांचे स्पष्ट छायाचित्र (फोटोग्राफ) जोडणे आवश्यक आहे.

- कार्यशाळा/चर्चासत्रे/परिषदेस उपस्थित सहभागी व्यक्तींच्या दोन दिवस उपस्थित असल्याबाबतची स्वाक्षरी दोन दिवसांच्या स्वतंत्र उपस्थित पत्रकावर घेणे अनिवार्य आहे. जर सहभागी व्यक्तींची एकच दिवस उपस्थित असल्याबाबतची स्वाक्षरी असेल तर कोणत्याही खर्चाची देयके स्विकारली जाणार नाहीत.

- विषयाशी संबंधित नसलेल्या औद्योगिक क्षेत्रातील सहभागी व्यक्तींना कार्यशाळा/चर्चासत्रे/ परिषदेमध्ये सहभागी व्यक्ती म्हणून दाखविल्यास संबंधित महाविद्यालय/परिसंस्थांची देयके स्विकारली जाणार नाहीत.

- महाविद्यालय/परिसंस्थेने राष्ट्रीय अथवा आंतरराष्ट्रीय कार्यशाळा/चर्चासत्रे/ परिषदेचे आयोजन केल्यानंतर त्याचे कार्यवृत्तांत अहवाल (प्रोसीडींग) छापणे अनिवार्य आहे.

- राष्ट्रीय स्तरावरील ज्या विषयाच्या कार्यशाळा/चर्चासत्रे/परिषदेचे आयोजन करण्यास मंजूरी दिली असेल परंतू सदर महाविद्यालय/परिसंस्थेत संबंधित विषयाच्या पदव्युत्तर अभ्यासक्रमास शुन्य विद्यार्थी संख्या असेल किंवा अभ्यासक्रम बंद असेल अशा महाविद्यालय/ परिसंस्थेंने राष्ट्रीय स्तरावरील कार्यशाळा/चर्चासत्रे/परिषदेचे आयोजन करु नये. तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावरील ज्या विषयाच्या कार्यशाळा/चर्चासत्रे/परिषदेचे आयोजन करण्यास मंजूरी दिली असेल परंतू सदर महाविद्यालय/परिसंस्थेत संबंधित विषयाच्या संशोधन केंद्राची मान्यता नसेल अथवा मान्यता काढून घेतलेली असेल किंवा शुन्य विद्यार्थी संख्या असेल तर संबंधित महाविद्यालय/परिसंस्थेने आंतरराष्ट्रीय स्तरावरील कार्यशाळा/चर्चासत्रे/ परिषदेचे आयोजन करू नये अन्यथा महाविद्यालय/परिसंस्थेच्या कोणत्याही खर्चाची देयके मंजूर केली जाणार नाहीत.

- कार्यशाळा/चर्चासत्रे/परिषदेचे आयोजन करण्यासाठी प्रस्ताव सादर करताना प्रस्तावा सोबत संबंधित महाविद्यालय/परिसंस्थेच्या प्राचार्य/संचालक यांच्या मान्यतेची प्रत जोडणे अनिवार्य आहे. सदर महाविद्यालय/परिसंस्थेस मान्यताप्राप्त प्राचार्य/संचालक नसेल तर अर्थसहाय्य मंजुर करण्यात येणार नाही.

- एखादया महाविद्यालयास/परिसंस्थेस जर कार्यशाळा/चर्चासत्रे/परिषद दर्जा बदल करावयाचा असेल म्हणजे उदा. राज्यस्तरीय आयोजन करण्यासाठी मिळालेल्या अनुदानातून राष्ट्रीय अथवा आंतरराष्ट्रीय कार्यशाळा/चर्चासत्रे/परिषद यांचे आयोजन करणे, तर त्यास सदर बदल करण्यास परवानगी देण्यात येणार नाही. जर महाविद्यालयाने/परिसंस्थेने स्वत:हूनच दर्जा बदल केल्यास त्यांचे हिशोब स्विकारण्यात येणार नाहीत.

- ज्या महाविद्यालय/परिसंस्थेने विद्यापीठाकडे महाविद्यालय/परिसंस्था बंद करण्यासाठी अर्ज केला असेल अशा महाविद्यालय/परिसंस्थेस कार्यशाळा/चर्चासत्रे/परिषद आयोजन करण्यासाठी परवानगी देण्यात येणार नाही. जर अशा महाविद्यालयांनी/परिसंस्थांनी कार्यशाळा/चर्चासत्रे/ परिषदेचे आयोजन केल्यास त्यांचे हिशोब स्विकारण्यात येणार नाहीत.

- कार्यशाळा/चर्चासत्रे/परिषदेचे आयोजन करण्यासाठी प्रस्ताव सादर करताना जर एखाद्या महाविद्यालय/संस्थेने जर प्रस्तावामध्ये चुकीची, दिशाभूल करणारी अथवा खोटी माहिती भरल्यास संबंधित महाविद्यालय/संस्थेस गुणवत्ता सुधार योजनेचा लाभ घेण्यास पुढील तीन वर्ष अपात्र समजण्यात येईल.

**************

# विशेष प्रोत्साहनपर अर्थसहाय्य

१०० वर्ष पूर्ण केलेल्या संलग्न महाविद्यालय/मान्यताप्राप्त परिसंस्थांसाठी शैक्षणिक वर्ष २०१६–१७ पासून विशेष अर्थसहाय्य योजना लागू करण्यात आली आहे. ज्या महाविद्यालये/परिसंस्थांनी चालू शैक्षणिक वर्षात १०० व्या महोत्सवी वर्षात पदार्पण केलेले असेल, अशा संबंधित महाविद्यालये/परिसंस्थांना त्याच शैक्षणिक वर्षात विविध राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय शैक्षणिक उपक्रमांचे आयोजन करण्यासाठी विशेष प्रोत्साहनपर रु.१० लाख इतके अर्थसहाय्य (विद्यापीठ हिस्सा ७५ टक्के व महाविद्यालयाचा हिस्सा २५ टक्के) संबंधित महाविद्यालये/परिसंस्थांनी सादर केलेल्या प्रस्तावानुसार देण्यात येईल.

सदर अर्थसहाय्यासाठी प्रस्ताव सादर करताना खालील अटीं व संबंधीत कागदपत्रांची पूर्तता करणे आवश्यक आहे.

१. महाविद्यालय/परिसंस्था सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी कायम संलग्नीत असल्याचे विद्यापीठाचे मान्यता पत्र तसेच नॅककडून महाविद्यालय/परिसंस्थेचे मुल्यांकन/पुर्नमुल्यांकन झाल्याचे विहित मुदतीतील प्रमाणपत्र.

२. महाविद्यालय/परिसंस्थेमध्ये कायमस्वरुपी/प्रभारी विद्यापीठ मान्यताप्राप्त प्राचार्य/संचालक असल्याचे मान्यता पत्र.

३. महाविद्यालय/परिसंस्थेची स्थापना ज्या वर्षी झालेली आहे त्या वर्षीचे विद्यापीठ मान्यता पत्र.

४. संबंधित महाविद्यालय/परिसंस्थेवर विद्यापीठ पातळीवर कोणतीही गंभीर स्वरुपाची कारवाई झालेली नसावी किंवा सुरु नसावी.

५. सदर महाविद्यालय/परिसंस्थेने विद्यापीठाचा सर्व प्रकारचा प्रोरेटा, संलग्नीकरण शुल्क, खर्चाचे सर्व हिशेब सादर केलेले असणे आवश्यक आहे.

६. महाविद्यालय/परिसंस्थेच्या महोत्सवी वर्षात वर्षभर राबविण्यात येणाऱ्या शैक्षणिक उपक्रमाची रुपरेषा व खर्चाचे अंदाजपत्रक.

७. सदर योजनेच्या अंतर्गत मंजुर रकमेचा विनियोग त्याच महोत्सवी वर्षात करणे बंधनकारक राहील.

**********

# क्रिडा साहित्य

- महाविद्यालय/परिसंस्थेच्या विद्यार्थी संख्येच्या प्रमाणात व उपलब्ध सोयीनुसार कमाल रु.१ लाख एकुण खर्चाच्या ७५:२५ प्रमाणानुसार अर्थसहाय्य मंजूर करण्यात येईल. सदरचे अर्थसहाय्य दोन वर्षातून एकदा मंजूर करण्यात येईल. (उदा. ज्या महाविद्यालय/परिसंस्थांना २०१७—२०१८ मध्ये क्रिडा साहित्यासाठी अर्थसहाय्य मंजूर करण्यात आलेले आहे, अशा महाविद्यालय/परिसंस्थांना २०१९—२०२० मध्ये प्रस्ताव दाखल करता येईल.)

- फक्त भांडवली स्वरूपातील क्रिडा साहित्य या योजनेअंतर्गत खरेदी करता येईल.

- सदर क्रिडा साहित्यासाठी इतर कोणत्याही संस्थेकडून/वित्तीय विभागाकडून अर्थसहाय्य घेतलेले नसावे किंवा यापूर्वी विद्यापीठाकडून त्याच साहित्यासाठी अर्थसहाय्य घेतलेले नसावे. यापूर्वी त्याच साहित्यासाठी अर्थसहाय्य घेतले आहे असे निदर्शनास आल्यास सदर वर्षामध्ये मंजूर केलेले अर्थसहाय्य हे रद्द करण्यात येईल व याची सर्वस्वी जबाबदारी संबधित महाविद्यालय/परिसंस्थेवर राहील.

- क्रिडा साहित्य अर्थसहाय्यासाठी प्रस्ताव सादर करताना महाविद्यालय/परिसंस्थेमध्ये मान्यताप्राप्त (कायम किंवा प्रभारी) प्राचार्य/संचालक असणे बंधनकारक आहे. तसेच क्रिडा साहित्य खरेदीसाठी अनुदान मंजूर करताना महाविद्यालयांमध्ये क्रिडागंण, व्यायामशाळा व मान्यताप्राप्त शारिरिक शिक्षण संचालक असणे बंधनकारक आहे. व्यावसायिक महाविद्यालये / परिसंस्था (अभियांत्रिकी / औषधनिर्माणशास्त्र / विधी / व्यवस्थापनशास्त्र/ शिक्षणशास्त्र महाविद्यालये) यांचेकरिता किमान हंगामी स्वरूपातील नियुक्त किंवा तर्दथ मान्यता असलेले शारिरिक शिक्षण संचालक आवश्यक आहे.

- क्रिडा साहित्य खरेदी अनुदानासाठी प्रस्ताव सादर करताना प्रस्तावासोबत संबंधीत महाविद्यालय/संस्थेतील विद्यार्थ्यांनी मागील शैक्षणिक वर्षामध्ये **किमान तीन व्यक्तिगत खेळामध्ये व दोन सांघिक खेळांमध्ये** आंतर—महाविद्यालयीन पातळीवर सहभाग घेतला असणे आवश्यक आहे, त्या संदर्भातील सहभागी विद्यार्थ्यांची नावे, त्यांना मिळालेल्या प्रशस्तीपत्राची प्रत तसेच सहभागी विद्यार्थ्यांची क्रिडा झोनल अध्यक्ष/सचिव यांनी सांक्षाकीत केलेली यादी व इतर कागदपत्रे प्रस्तावासोबत जोडणे आवश्यक आहे.

- महाविद्यालय/परिसंस्थेचे स्वतंत्र खेळाचे मैदान व क्रिडा साहित्य ठेवण्यासाठी स्वतंत्र हॉल असणे अनिवार्य आहे.

- खेळाचे साहित्य खरेदी करण्यासाठी वेगवेगळया किमान तीन कंपन्यांचे कोटेशन व तुलनात्मक तक्ता (Comparitive Chart) इ. प्राचार्याच्या सही व शिक्क्यासह प्रस्तावासोबत जोडणे आवश्यक आहे.

- महाविद्यालय/परिसंस्थेने क्रिडा साहित्य खरेदी केल्यानंतर स्टॉक रजिस्टर अद्ययावत ठेवणे आवश्यक आहे. जर एखादे क्रिडा साहित्य खराब झाले. तर तशी नोंद स्टॉक रजिस्टर मध्ये ठेवावी.

- क्रिडा साहित्यावर स्टॉक रजिस्टर नोंदणी क्रमांक, योजनेचे नाव व खरेदी करण्यात आलेले महिना व वर्ष याची नोंद करावी.

**************

## कार्यालयीन, शैक्षणिक व प्रयोगशाळा उपकरणे व दिव्यांग व्यक्तींसाठी उपयोगी वस्तु खरेदी

- या योजनेअंतर्गत संलग्न महाविद्यालय/मान्यताप्राप्त परिसंस्थांच्या प्रस्तावानुसार 'कार्यालयीन, शैक्षणिक व प्रयोगशाळा उपकरणे व अपंग/दिव्यांग व्यक्तींसाठी उपयोगी वस्तु खरेदी' याअंतर्गत मार्गदर्शकतत्वांच्या अधिन राहून जास्तीत जास्त रुपये एक लाख इतके अर्थसहाय्य एकुण खर्चाच्या ७५:२५ प्रमाणानुसार मंजूर करण्यात येईल.

- प्रयोगशाळेतील काचेची उपकरणे, रसायने, जनरेटर, युपीएस, युपीएस बॅटरीज्, इ.पी.बी. एक्स. सिस्टीम, फर्निचर, व्हिडीओ कॅमेरा, लॅपटॉप, कॉम्प्युटर हार्डडिस्क तसेच इतर प्रकारच्या उपभोग्य (Consumable) वस्तूंसाठी अनुदान मंजूर केले जाणार नाही.

- गुणवत्ता सुधार योजनेअंतर्गत महाविद्यालय/परिसंस्थेने पूर्वी मिळालेल्या अर्थसहाय्यातून एखादे कार्यालयीन, शैक्षणिक व प्रयोगशाळा उपकरण खरेदी खरेदी केलेले असल्यास तेच उपकरण महाविद्यालय/परिसंस्थेस तीन वर्षापर्यत पुन:श्च खरेदी करता येणार नाही.

- खरेदी करण्यात येणारी कार्यालयीन, शैक्षणिक व प्रयोगशाळा उपकरणे व अपंग/दिव्यांग व्यक्तींसाठी उपयोगी वस्तु यासाठी तीन अधिकृत पुरवठाधारकांचे कोटेशन व तुलनात्मक तक्ता इ. प्राचार्य/संस्थाचालकाच्या सही व शिक्क्यासह प्रस्तावासोबत जोडणे आवश्यक आहे.

- महाविद्यालय/परिसंस्थेने कार्यालयीन, शैक्षणिक व प्रयोगशाळा उपकरणे व अपंग/दिव्यांग व्यक्तींसाठी उपयोगी वस्तु खरेदी केल्यानंतर स्टॉक रजिस्टर अद्ययावत ठेवणे आवश्यक आहे. जर एखादे कार्यालयीन, शैक्षणिक व प्रयोगशाळा उपकरण खराब झाले. तर तशी नोंद स्टॉक रजिस्टर मध्ये ठेवावी.

- कार्यालयीन, शैक्षणिक व प्रयोगशाळा उपकरणे व अपंग/दिव्यांग व्यक्तींसाठी उपयोगी वस्तुवर स्टॉक रजिस्टर नोंदणी क्रमांक, योजनेचे नाव व खरेदी करण्यात आलेले महिना व वर्ष याची नोंद करावी.

**************

# बांधकाम

गुणवत्ता सुधार योजनेअतंर्गत संलग्न महाविद्यालय/मान्यताप्राप्त परिसंस्थांना पुढील नमूद केलेल्या बांधकाम प्रकारांसाठी १) विद्यार्थी, विद्यार्थीनीसाठी व दिव्यांग व्यक्तींसाठी प्रसाधनगृह २) महिला कर्मचाऱ्यांसाठी सर्व सुविधांनीयुक्त स्वतंत्र कक्ष ३) अनिवासी विद्यार्थी केंद्र ४) पार्कींग शेड ५) पिण्याच्या पाण्याची टाकी ६) कॅफेटेरिया ७) जुन्या इमारतीमध्ये दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी रॅम्प बांधणे ८) सौर–ऊर्जा उपकरणे इ. करिता मार्गदर्शकतत्वांस अनुसरून वरीलपैकी कोणत्याही एकाच बांधकाम प्रकारासाठी किंवा सौर–ऊर्जा उपकरणे बसविण्यासाठी प्रस्ताव सादर करता येईल. बांधकामासाठी तीन वर्षातून एकदा अर्थसहाय्य मंजूर झाल्यानंतर तीन वर्षाच्या आत बांधकाम पूर्ण करून हिशेब सादर करणे अनिवार्य आहे. सदर हिशेब सादर केल्यानंतरच बांधकामासाठी नव्याने प्रस्ताव सादर करता येईल. (उदा. ज्या महाविद्यालये/परिसंस्थांना आर्थिक वर्ष २०१६–१७ मध्ये बांधकामासाठी अर्थसहाय्य मंजूर करण्यात आलेले आहे व बांधकाम पूर्ण करून सदर महाविद्यालय/परिसंस्थेने त्याचे हिशोब विद्यापीठास सादर केलेले आहेत, अशा महाविद्यालये/परिसंस्थांना आर्थिक वर्ष २०१९–२० मध्ये प्रस्ताव सादर करता येतील).

सदर अर्थसहाय्य एकूण खर्चाच्या **७५:२५** प्रमाणानुसार (७५% विद्यापीठ हिस्सा २५% महाविद्यालय/परिसंस्थेचा हिस्सा) मंजूर करण्यात येईल. सौर–ऊर्जा उपकरणे यासाठी स्वतंत्र मार्गदर्शक तत्वे पुढे दिलेली आहेत. त्यानुसारच सौर–ऊर्जा उपकरणेसाठी प्रस्ताव सादर करता येईल. पार्किग शेड, पिण्याच्या पाण्याची टाकी, दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी रॅम्प वगळता इ. नमूद केलेली बांधकामे किमान ५०० स्क्वे.फुट. आर.सी.सी. असणे अनिवार्य आहे.

गुणवत्ता सुधार योजनेअंतर्गत ज्या महाविद्यालये/परिसंस्थांना आर्थिक वर्ष २०१६–१७ किंवा त्यापूर्वी बांधकामासाठी अर्थसहाय्य मंजूर झालेले आहे व ज्या महाविद्यालये/परिसंस्थांनी उचल रक्कम देखील घेतलेली आहे व विहीत मुदतीत बांधकाम केलेले नाही अथवा बांधकामाचे हिशेब सादर केलेले नाहीत अशी सर्व संबंधित महाविद्यालये/परिसंस्था बांधकाम अर्थसहाय्यास पात्र राहणार नाहीत.

या योजनेअंतर्गत ज्या महाविद्यालये/परिसंस्थांना बांधकामासाठी अर्थसहाय्य मंजूर झालेले आहे त्या महाविद्यालये/परिसंस्थांनी बांधकाम मुदती मधील प्रगती अहवाल (progress report) दर वर्षी मार्च अखेर संबंधित वास्तुविशारद यांच्या सही व शिक्क्यासह मा. प्राचार्य यांच्या मार्फत नियोजन व विकास विभागास सादर करावा.

बांधकामासाठीचा निधी तीन वर्षातून एकदा मंजूर करण्यात येईल मात्र विद्यापीठाने अर्थसहाय्य दिलेल्या याच बांधकामासाठी इतर वित्तीय संस्थांकडून अर्थसहाय्य घेतलेले नसावे. तसेच इतर संस्था/वित्तीय संस्थेकडून अर्थसहाय्य घेवून बांधलेल्या इमारतीमध्येच गुणवत्ता सुधार योजने अंतर्गत पुन्हा अर्थसहाय्य घेवून बांधकाम करण्यास परवानगी दिली जाणार नाही. जर अशा इमारतीमध्ये गुणवत्ता सुधार योजने अंतर्गत बांधकाम केलेले आढळून आल्यास संबंधीत महाविद्यालय/परिसंस्थेचे हिशेब स्विकारले जाणार नाही. या योजनेअतंर्गत मंजूर झालेल्या बांधकाम अर्थसहाय्यातून फर्निचर व उपकरणे घेण्यास परवानगी दिली जाणार नाही.

बांधकामाच्या अर्थसहाय्यासाठी विद्यापीठाने विहित केलेल्या नमुन्यामध्ये आवश्यक माहितीसह विहित मुदतीत प्रस्ताव सादर करणे आवश्यक आहे. या अर्थसहाय्यासाठी अपंग विद्यार्थ्यांसाठी रॅम्प वगळता कमाल मर्यादा रूपये ५ लाख अशी आहे व रॅम्प बांधण्यासाठी कमाल रू.५०,०००/— अशी आहे.

**नवीन बांधकामामध्ये प्रामुख्याने खालील प्रकारच्या बांधकामांचा समावेश असावा.**

१) **विद्यार्थी व विद्यार्थिनीसाठी अनिवासी विद्यार्थी केंद्र:—** विद्यार्थी/विद्यार्थिनींना बसण्यासाठी स्वतंत्र व्यवस्था असावी तसेच पिण्याच्या पाणी आणि प्रसाधनगृह इ. सुविधा असाव्यात. यामध्ये कुठल्याही प्रकारचे फर्निचर व उपकरणे घेण्यास परवानगी दिली जाणार नाही.

२) **विद्यार्थी, विद्यार्थिनीसाठी व दिव्यांग व्यक्तीसाठी प्रसाधनगृहे :—** कमीतकमी पाच टॉयलेट ब्लॉक पैकी दिव्यांग व्यक्तींसाठी दोन टॉयलेट ब्लॉक असणे आवश्यक आहे. प्रसाधनगृहाच्या आतील भिंतीना किमान सहा फुटांपर्यंत टाईल्स लावणे बंधनकारक आहे.

३) **महिला कर्मचाऱ्यांसाठी सुसज्ज स्वतंत्र कक्ष** — यामध्ये प्रामुख्याने प्रसाधनगृह, पिण्याचे पाणी इत्यादी गोष्टींचा समावेश असणे आवश्यक आहे.

४) **पार्किंग शेड** — पार्किंग शेड बांधलेल्या ठिकाणची जमीन पेविंग ब्लॉक किंवा सिंमेट कॉक्रीटने आच्छादलेली असावी. सायकली व दुचाकी गाडया वाहनतळावर व्यवस्थिपणे लावण्यासाठी रंगांच्या पट्टयांची आखणी, सायंकालीन वर्गांच्या दृष्टीने वाहनतळावर करावी लागणारी प्रकाश व्यवस्था, वाहनतळाच्या नियमांबाबतीत योग्य त्या सूचनांचे फलक इ. व्यवस्था असावी.

५) **पिण्याच्या पाण्याची टाकी बांधणे—** टाकीचे बांधकाम आर.सी.सी. मध्येच असणे आवश्यक आहे.

६) **कॅफेटेरिया —** पिण्याच्या पाण्याची व्यवस्था असणे आवश्यक आहे. तसेच यामध्ये कुठल्याही प्रकारचे फर्निचर व उपकरणे घेण्यास परवानगी दिली जाणार नाही.

७) **जुन्या इमारतीमध्ये अपंग विद्यार्थ्यांसाठी रॅम्प बांधणे —** सदर रॅम्प बांधण्यासाठी कमाल रू.५०,०००/— (विद्यापीठ हिस्सा ७५% व महाविद्यालय हिस्सा २५%) मंजूर करण्यात येईल. (सदरील अर्थसहाय्य हे फक्त जुन्या इमारतीमध्येच रॅम्प बांधण्यासाठी लागू राहिल)

**अर्थसहाय्यासाठी प्रस्तावासोबत खालील बाबींची पूर्तता करणे अनिवार्य आहे.**

१) विद्यापीठाकडे बांधकाम अर्थसहाय्यासाठी प्रस्ताव पाठविताना प्रस्तावासोबत महाविद्यालयाचे प्राचार्य/परिसंस्थेचे संचालक व संस्थेचे अध्यक्ष/सचिव यांचे महाविद्यालयाच्या/ परिसंस्थेच्या लेटरहेडवरील संयुक्त सहीचे हमीपत्र जोडणे आवश्यक आहे.

२) नविन बांधकामासाठी प्रस्ताव सादर करताना मान्यताप्राप्त वास्तुविशारदाचा (आर्किटेक्ट) बांधकामाचा आराखडा अथवा महानगरपालिका/नगरपरिषद/ग्रामपंचायत यांचेकडून नकाशा मंजूर केला असल्यास त्यांची प्रत व बांधकामाचे कोटेशन इ. प्रस्तावासोबत जोडावे. तसेच संबंधित बांधकाम पूर्ण झाल्यानंतर त्याबाबतचे हिशोब विद्यापीठास सादर करताना त्यासोबत बांधकामाचा आराखडा, महानगरपालिका/ नगरपरिषद/ग्रामपंचायत यांचा मंजूर नकाशा व बांधकाम पूर्णत्वाचा दाखला जोडणे अनिवार्य आहे. पार्कींग शेड, पिण्याच्या पाण्याची टाकी व अपंग विद्यार्थ्यांसाठी रॅम्प इ. बांधकाम पूर्णत्वा नंतर हिशेब सादर करताना वास्तुविशारदाचा (आर्किटेक्ट) बांधकाम पूर्णत्वाचा दाखला जोडला तरी चालेल.

************

## आदिवासी क्षेत्रातील महाविद्यालये/परिसंस्था —गरजेवर आधारित उपक्रम

आदिवासी विभागातील महाविद्यालय/परिसंस्थांच्या स्थानिक गरजा लक्षात घेवून गरजेवर आधारित उपक्रमांतर्गत देण्यात येणाऱ्या अर्थसहाय्यातून आदिवासी विभागातील विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष लाभ होण्याच्या दृष्टीने सदरील महाविद्यालये/परिसंस्थेमधील प्रथम वर्षातील गुणानुक्रमे पहिल्या २० विद्यार्थ्यांना (१० मुले व १० मुली) इयत्ता १२ वी (H.S.C.) चे गुण विचारात घेता गुणवत्तेवर आधारित कायमस्वरूपी सायकली देण्यासाठी कमाल रु.५०,०००/— इतके अर्थसहाय्य देण्यात येईल. याबाबतची विद्यार्थ्यांची स्वतंत्र यादी व खरेदीच्या आर्थिक नियमावलीची सर्व माहिती विद्यापीठाकडून मान्य करून घेतल्यानंतरच खरेदीची सर्व प्रक्रिया महाविद्यालय/परिसंस्था स्तरावर करण्यात यावी. या उपक्रमांतर्गत अर्थसहाय्यासाठी प्रस्ताव दाखल करताना आदिवासी विभागात महाविद्यालय येत असल्याचे प्रकल्प अधिकाऱ्यांचे प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे.

सायकली ज्या विद्यार्थ्यांना वाटण्यात आल्या त्यांच्या स्वाक्षरीची यादी व सायकली वाटप कार्यक्रमाची रंगीत छायाचित्रे हिशेब सादर करताना देयकासोबत जोडणे अनिवार्य आहे.

************

## गुणवत्ता सुधार योजनेअंतर्गत देण्यात येणाऱ्या अर्थसहाय्यासाठी सामाईक नियमावली

१. महाविद्यालय/परिसंस्थेला राज्य, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरील कार्यशाळा/चर्चासत्र/परिषदेचे आयोजन, क्रीडा साहित्य व कार्यालयीन, शैक्षणिक व प्रयोगशाळा उपकरणे व दिव्यांग व्यक्तींसाठी उपयोगी वस्तु खरेदी, तसेच नवीन बांधकाम व सौर–ऊर्जा उपकरणे खरेदी, तसेच फक्त आदिवासी विभागातील महाविद्यालय/परिसंस्थांच्या स्थानिक गरजा लक्षात घेवून त्यांना गरजेवर आधारित उपक्रमांतर्गत विद्यार्थी/विद्याथीनींसाठी सायकल खरेदी इत्यादिसाठी एकूण खर्चाच्या ७५:२५ प्रमाणानुसार अर्थसहाय्य मंजूर करण्यात येईल.

२. विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालये/मान्यताप्राप्त परिसंस्था जर संबंधित महाविद्यालयाच्या/परिसंस्थेच्या स्वतंत्र अभिमत/खाजगी विद्यापीठाशी (महाविद्यालय/परिसंस्था विद्यापीठाशी संलग्नीत असलेल्या नावाने अथवा बदलेल्या नावाने) संलग्नीत झाले असेल तर अशा अभिमत/खाजगी विद्यापीठाशी संलग्नीत महाविद्यालय/परिसंस्थेला गुणवत्ता सुधार योजनेअंतर्गत प्रस्ताव दाखल करता येणार नाही.

३. ज्या महाविद्यालय/परिसंस्थेने विद्यापीठाकडे महाविद्यालय/परिसंस्था बंद करण्यासाठी अर्ज सादर केला असेल अशा महाविद्यालय/परिसंस्थेचा गुणवत्ता सुधार योजनेअंतर्गत अर्थसहाय्यासाठीचा मंजूर करण्यात येणार नाही. जर अशा महाविद्यालयांनी/परिसंस्थांनी या योजनेअंतर्गत कोणताही उपक्रम राबविल्यास त्यांचे हिशेब स्विकारण्यात येणार नाहीत.

४. ज्या महाविद्यालयात/परिसंस्थेत प्रथम वर्ष विद्यार्थी संख्या शून्य आहे अशा महाविद्यालय/परिसंस्थांना गुणवत्ता सुधार योजनेअंतर्गत अर्थसहाय्यासाठी प्रस्ताव सादर करता येणार नाही. अशा महाविद्यालयांनी/परिसंस्थांनी या योजनेअंतर्गत कोणताही उपक्रम राबविल्यास त्यांचे हिशेब स्विकारण्यात येणार नाहीत.

५. विद्यापीठ वार्षिक अहवाल सन २०१८–२०१९ ची माहिती देणे बंधनकारक आहे. नियोजन व विकास विभागाला वार्षिक अहवालाची माहिती जमा केल्याची पोहोच प्रत, त्याचप्रमाणे चालू शैक्षणिक वर्षाची AISHE व MIS ची माहिती भरली असल्याचे प्रमाणपत्र अथवा ना–हरकत प्रमाणपत्र, विद्यापीठ निधी (प्रोरेटा) क्रीडा विभाग, विद्यार्थी विकास मंडळ, शैक्षणिक प्रवेश विभाग, प्रोरेटा तसेच चालू शैक्षणिक वर्षाचे संलग्नीकरणाचे (नुतनीकरण) शुल्क भरलेल्या चलनाची छायाप्रत इ. प्रस्तावासोबत जोडणे आवश्यक आहे.

६. गुणवत्ता सुधार योजनेअंतर्गत प्रस्ताव सादर करताना जर एखाद्या महाविद्यालय/संस्थेने प्रस्तावामध्ये चुकीची, दिशाभूल करणारी अथवा खोटी माहिती सादर केल्यास संबंधित महाविद्यालय/संस्थेस गुणवत्ता सुधार योजनेचा लाभ घेण्यास पुढील तीन वर्ष अपात्र ठरविण्यात येईल.

७. महाविद्यालय/परिसंस्था सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी कायम संलग्नीत असल्याचे विद्यापीठाचे पत्र प्रस्तावासोबत जोडणे आवश्यक आहे.

८. महाविद्यालय/परिसंस्थेमध्ये कायमस्वरुपी/प्रभारी विद्यापीठ मान्यताप्राप्त प्राचार्य/ संचालक असल्याचे मान्यता पत्र.

९. संबंधित महाविद्यालय/परिसंस्थेतील कायमस्वरूपी मान्यताप्राप्त/प्रभारी प्राचार्य/ संचालक यांची सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ कार्यक्षेत्रातील एका महाविद्यालय/ परिसंस्थेतून दुसऱ्या महाविद्यालय/परिसंस्थेत बदली झाली असेल तर संस्थेच्या बदली आदेशाची प्रत तसेच प्राचार्य/संचालक यांची बदली सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ कार्यक्षेत्राबाहेरून झाली असल्यास सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे मान्यता पत्र प्रस्तावासोबत जोडणे बंधनकारक आहे.

१०. संबंधित महाविद्यालय/परिसंस्थेवर विद्यापीठ पातळीवर कोणतीही गंभीर स्वरुपाची कारवाई झालेली नसावी किंवा सुरू नसावी.

११. सदर महाविद्यालय/परिसंस्थेने विद्यापीठाकडून उचल रकमेअंतर्गत घेतलेल्या रकमेचे सर्व खर्चाचे हिशेब विद्यापीठास सादर केलेले असणे आवश्यक आहे.

१२. क्रीडा साहित्य व कार्यालयीन, शैक्षणिक व प्रयोगशाळा उपकरणे व दिव्यांग व्यक्तींसाठी उपयोगी वस्तु खरेदीसाठी कोणत्याही संस्थेकडून/वित्तीय विभागाकडून अर्थसहाय्य घेतलेले नसावे किंवा यापूर्वी विद्यापीठाकडून त्याच साहित्यासाठी अर्थसहाय्य घेतलेले नसावे. यापूर्वी त्याच साहित्यासाठी अर्थसहाय्य घेतले आहे असे निदर्शनास आल्यास सदर वर्षामध्ये मंजूर केलेले अर्थसहाय्य हे रद्द करण्यात येईल व पुढील तीन वर्षांपर्यंत अशा महाविद्यालय/परिसंस्थांना क्रीडा साहित्य व कार्यालयीन, शैक्षणिक व प्रयोगशाळा उपकरणे व दिव्यांग व्यक्तींसाठी उपयोगी वस्तु खरेदी अनुदानासाठी अपात्र ठरविण्यात येईल. ज्या साहित्य खरेदीसाठी अनुदान मंजूर केले आहे, ते साहित्य खरेदी केल्यानंतर पुन्हा पुढील पाच वर्षे तेच साहित्य खरेदी करता येणार नाही, याची नोंद घ्यावी.

१३. क्रीडा साहित्य व कार्यालयीन, शैक्षणिक व प्रयोगशाळा उपकरणे व दिव्यांग व्यक्तींसाठी उपयोगी वस्तु इ. साहित्य खरेदी ही विद्यापीठाच्या अध्यादेश क्र. १५१ मधील तरतूदींनुसार वेगवेगळया किमान तीन पुरवठादारांचे/कंपन्यांचे दरपत्रक व तुलनात्मक तक्ता (Comparitive Chart) या सर्वांवर प्राचार्यांची सही घेऊन शिक्क्यासह प्रस्तावासोबत जोडणे आवश्यक आहे.

१४. क्रीडा साहित्य व कार्यालयीन, शैक्षणिक व प्रयोगशाळा उपकरणे व दिव्यांग व्यक्तींसाठी उपयोगी वस्तु इ. साहित्य खरेदी करण्यासाठी तीन पुरवठादारांची/कंपन्यांची दरपत्रके जर ई—मेल वरुन मागविली असतील तर सदर दरपत्रके ज्या ई—मेल वरुन

आले त्या ई–मेलच्या पहिल्या पानाची प्रत व दरपत्रक प्राचार्य/संचालकांच्या सही शिक्यासह प्रस्तावासोबत सादर करणे आवश्यक आहे.

१५. कमाल रु. ५०००/– च्या आतील क्रीडा साहित्य व  कार्यालयीन, शैक्षणिक व प्रयोगशाळा उपकरणे व दिव्यांग व्यक्तींसाठी उपयोगी वस्तु इ. सर्व प्रकाराचे साहित्य खरेदी करता येणार नाही.

१६. महाविद्यालय/परिसंस्थेने क्रीडा साहित्य व  कार्यालयीन, शैक्षणिक व प्रयोगशाळा उपकरणे व दिव्यांग व्यक्तींसाठी उपयोगी वस्तु खरेदी केल्यानंतर स्टॉक रजिस्टर अद्ययावत ठेवणे आवश्यक आहे. क्रीडा साहित्य व कार्यालयीन, शैक्षणिक व प्रयोगशाळा उपकरणे व दिव्यांग व्यक्तींसाठी उपयोगी वस्तू इ.साहित्यावर स्टॉक रजिस्टर नोंदणी क्रमांक, योजनेचे नाव व खरेदी करण्यात आलेले महिना व वर्ष याची नोंद करावी. जर एखादे साहित्य खराब झाले. तर तशी नोंद स्टॉक रजिस्टर मध्ये ठेवावी.

१७. खरेदी केलेल्या साहित्यावर स्टॉक रजिस्टर नोंदणी क्रमांक पुसला जाणार नाही अशा पध्दतीने ठळकपणे नोंदविणे आवश्यक आहे. तसेच असे साहित्य विद्यापीठाकडून प्राप्त अनूदानातून खरेदी केलेले आहे. त्यावर सुस्पष्ट व ठळकपणे विद्यापीठाचे व योजनेचे नांव नमूद करणे आवश्यक आहे.

१८. खरेदी केलेल्या क्रीडा साहित्य व  कार्यालयीन, शैक्षणिक व प्रयोगशाळा उपकरणे व अपंग/दिव्यांग व्यक्तींसाठी उपयोगी वस्तु इ. साहित्याचे प्राचार्य/संचालक व क्रीडा संचालक यांचेबरोबर असलेले छायाचित्रे अंतिम हिशेब सादर करताना जोडणे आवश्यक आहे. छायाचित्र साहित्यावर स्टॉक रजिस्टर नोंदणीचा उल्लेख दिसावा अशा पध्दतीने हवे.

१९. विद्यापीठाकडे नवीन बांधकाम व सौर–ऊर्जा उपकरणे, इ. अर्थसहाय्यासाठी प्रस्ताव पाठविताना प्रस्तावासोबत महाविद्यालयाचे प्राचार्य/परिसंस्थेचे संचालक व संस्थेचे अध्यक्ष/सचिव यांचे महाविद्यालयाच्या/परिसंस्थेच्या लेटरहेडवरील संयुक्त सहीचे हमीपत्र जोडणे आवश्यक आहे.

२०. खरेदी केल्या जाणाऱ्या उपकरणांची, तसेच सर्व प्रकारच्या कार्यशाळा/ चर्चासत्रे/परिषदांची, बांधकामे, इत्यादींची रंगीत छायाचित्रे प्रस्तावास जोडणे अनिवार्य आहे.

२१. सादर केलेल्या प्रस्तावास मिळणारे अर्थसहाय्य हे संबंधीत अर्थशिर्षात शिल्लक असलेल्या रकमेच्या अधिन राहून याबाबत निर्णय घेतले जातील.

२२. कोणताही प्रस्ताव मंजूर/ना-मंजूर करण्याचे अधिकार विद्यापीठाकडे राखीव असतील.

************

## ऑनलाईन पध्दतीने प्रस्ताव सादर करण्याची लिंक खालील प्रमाणे

**unipune.ac.in-Home page – BOD Online – Login – For College Users – College Login & Password – Quality Improvement Programme**

ऑनलाईन पध्दतीने सादर केलेल्या प्रस्तावाची प्रत छापून (Printout) त्यासोबत मार्गदर्शकतत्वांमध्ये नमूद केल्याप्रमाणे आवश्यक ती सर्व कागदपत्रे जोडून विद्यापीठाच्या नियोजन व विकास विभागाकडे विहित मुदतीत सादर करावी. विहीत मुदतीनंतर, अपूर्ण कागदपत्रे जोडलेले, मार्गदर्शक तत्वांनुसार नसलेले प्रस्ताव विचारात घेतले जाणार नाहीत.

************